फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

TRTI
संशोधनेन् कल्याणम्
MAHARASHTRA STATE, PUNE

# स्वयम प्रकल्प
# मूल्यमापन अहवाल

(सन-२०२२-२३)




## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

**२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११००१**

*मार्फत*

## ए. एफ. सी. इंडिया लिमिटेड,

**पश्चिम विभागीय कार्यालय, नागपूर**

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा जीवनस्तर उंचविण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या लाभांचे आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती, प्रगती, आरोग्य इत्यादींवर झालेला परिणाम/बदल याबाबतचे मूल्यमापन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणेमार्फत करण्यात येते.

राज्यातील अनुसूचित क्षेत्रामधील कुटुंबांची संतुलित आहाराची गरज लक्षात घेऊन, त्या भागात कुक्कुटपालन व पशुसंवर्धन विषयक इतर योजना राबविणे, स्वयंरोजगार निर्मिती करणे आणि त्या कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वसमावेशक एकात्मिक योजना राबविण्याचे दृष्टीने तसेच राज्यातील आदिवासी कुटुंबांना कुक्कुट पालनाव्दारे रोजगार उपलब्ध होऊन अंगणवाड्यांमधून पूरक आहाराव्दारे अंडी पुरविण्यासाठी सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षांच्या कालावधीत "स्वयम प्रकल्प" पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी आदिवासी विकास विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आला आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात आलेल्या या प्रकल्पांतर्गत ग्रामीण भागात कुक्कुट पालनास मिळालेली चालना, आदिवासी लाभार्थीना स्वयंरोजगाराचे साधन, निरंतर चरितार्थाचा स्त्रोत व आहारातील पोषण मूल्यात झालेली वृद्धी या बाबींच्या साध्यतेविषयी विश्लेषणात्मक मूल्यमापन अहवाल AFC India Ltd., Mumbai या संस्थेने शिफारसींसह सादर केला आहे.

दिनांक : १६/१२/ २०२२
ठिकाण : पुणे

(डॉ.राजेंद्र भारूड, भा.प्र.से.)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

# ऋणनिर्देश

महाराष्ट्र शासनातर्फ राबविण्यात आलेल्या राज्यातील अनुसूचित क्षेत्रामधील कुटुंबांची संतुलित आहाराची गरज लक्षात घेऊन, त्या भागात परसातील कुक्कुट पालन व पशुसंवर्धन विषयक योजना राबविणे तसेच, स्वयंरोजगार निर्मिती करणे आणि त्या कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वसमावेषक एकात्मिक योजना राबविण्यासाठी व राज्यातील आदिवासी कुटुंबांना ग्रामीण परसातील कुक्कुट पालनाद्वारे रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या स्वयम प्रकल्पाचे मूल्यमापन अभ्यास पूर्ण करण्यात अनेकांचा मोलाचा सहभाग आहे.

मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह (भा.प्र.से), आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि मा. डॉ. राजेंद्र भारुड, (भा.प्र.से), आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी स्वयंम प्रकल्पाचे मूल्यमापन करण्याची संधी दिली यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत.

मा. डॉ. धनंजय परकाळे, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि मा. डॉ. प्रशांत द. भड; उपायुक्त पशुसंवर्धन (पशुधन व कुक्कुट) पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे यांनी सदर मूल्यमापन अभ्यासासाठी वेळोवेळी मार्गदर्शन तसेच क्षेत्रिय स्तरावर केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

या मूल्यमापन अभ्यासासाठी श्री. हंसध्वज सोनवणे, उपसंचालक, श्रीमती प्रियांका बोकील, संशोधन अधिकारी व श्री. गणेश चिंचकर, सहायक संशोधन अधिकारी, आं.सं.प्र.सं., पुणे तसेच श्री. संतोष शिवराम पवार, प्रकल्प समन्वयक, स्वयम् प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे यांचे मार्गदर्शन लाभले त्यासाठी आम्ही त्यांचे आभार व्यक्त करतो.

स्वयम प्रकल्पा अंतर्गत मूल्यमापन करताना आम्हाला पशुसंवर्धन आयुक्तालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालय आणि विभाग तसेच विविध नामीत व अधिनस्त अधिकाऱ्यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले त्यांचेही आम्ही आभारी आहोत. अभ्यास गटास आवश्यक माहिती पुरविण्यासाठी त्यांचा मौल्यवान वेळ आणि अनुभव सामायिक करणे आणि अभिप्राय प्रदान करणे यासाठी सर्व विभागांतील अधिकारी तथा कर्मचारी यांचेसुद्धा विशेष आभार व्यक्त करतो.

त्याचप्रमाणे स्वयम प्रकल्पातील उत्तरदाते लाभार्थी, आणि मदर युनिट चालक / मालकांचे तसेच अंगणवाडी सेविका, कर्मचारी यांचे प्राप्त झालेले सहकार्य आणि त्यांचे अभिप्राय याबद्दल या सर्वांचे आभार व्यक्त करतो.

**अभ्यास गट**
एएफसी इंडिया लिमीटेड
**(AFC INDIA LTD)**

# अनुक्रमणिका


प्रकरण क्र. १ - स्वयम प्रकल्पाची माहिती ........ १

१.१ प्रकल्प ओळख : ........ १

१.२ योजनेची गरज : ........ १

१.३ योजनेचा उद्देश : ........ २

१.४ योजनेचे उद्दिष्ट : ........ २

१.५ योजनेत सहभागी शासन विभाग आणि जबाबदारी व कार्य : ........ २

१.६ स्वयम प्रकल्पा अंतर्गत जिल्हानिहाय लाभार्थींचा तपशिल ........ ५

प्रकरण क्र. २ - दृष्टीकोन आणि पध्दती ........ ६

२.१ मुल्यमापनाची उद्दिष्टे ........ ६

२.२ नमुना निवड ........ ६

२.३ माहिती संकलन आणि विश्लेषण ........ ७

२.४ नियोजित वर्णनात्मक साधने ........ ७

२.५ अभ्यास व्याप्ती ........ ७

२.६ प्रक्षेत्र भेटी ........ ८

२.७ अहवालाची संरचना ........ ८

२.८ अहवालाची उपयुक्तता ........ ८

२.९ मूल्यमापनासाठी भरण्यात आलेली पत्रके ........ ८

प्रकरण क्र. ३ - विश्लेषण ........ १०

३.१ लाभार्थ्यांसाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष ........ १०

३.१.१ जिल्हानिहाय लाभार्थी निवड ........ १०

३.१.२ जिल्हानिहाय संवर्ग निहाय लाभार्थी संख्या ........ ११

३.१.३ जिल्हानिहाय सरासरी कुटुंब सदस्य संख्या ........ ११

३.१.४ जिल्हानिहाय लाभार्थी कुटुंबांचा मुख्य व्यवसाय आणि प्रमुख आर्थिक साधन ........ १२

३.१.५ जिल्हानिहाय लाभार्थी कुटुंबांचा जोडधंदा ........ १२

३.१.६ लाभार्थींच्या स्वतःच्या मालकीच्या शेतजमीनीचा जिल्हानिहाय तपशील ........ १३

३.१.७ शेतजमीनीचे क्षेत्रफळ ........ १३

३.१.८ परिचयात्मक एकदिवशीय कार्यशाळा आयोजनाबाबत जिल्हानिहाय तपशील ........ १४

३.१.९ सद्यस्थितीमध्ये सरासरी एकूण उपलब्ध पक्षी ........ १४

३.१.१० वाटप केलेल्या पक्षांकडून घेतलेल्या उत्पन्नाचे स्वरूप ........ १५

३.१.११ प्राप्त पक्षांपासून प्रति दिवस अंडी उत्पादन ........ १५

३.१.१२ जिल्हानिहाय अंडी विक्री स्थिती ........ १६

३.१.१३ अंडी विक्री कमी असल्याची कारणे ........ १६

३.१.१४ पक्षांचे लसीकरणाची माहिती ........ १७

३.१.१५ पक्षांना लसीकरण करणाऱ्या यंत्रणांचा तपशील ........ १७

३.१.१६ पक्षांना लसीकरण न होण्याची कारणे ........ १८

३.१.१७ कुक्कुटपालनामुळे मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न ........ १८

३.१.१८ लाभार्थ्यांना कुक्कुट पालनातून झालेला फायदा ........ १९

३.१.१९ योजना प्रभावीपणे राबविण्यासाठीच्या उपाययोजना ........ १९

३.२ अंगणवाडीसाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष ........ २०

३.२.१ जिल्हानिहाय अंगणवाडी निवड ........ २०

३.२.२ स्वयम प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला अंड्यांच्या पुरवठाबाबत ........ २०

३.२.३ प्रकल्पा अंतर्गत प्रति दिवशी अंगणवाडीला केलेल्या अंड्यांच्या पुरवठयाबाबत ........ २१

३.२.४ प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला विहित वेळेत व पुरेशा अंड्यांच्या पुरवठयाबाबत ........ २१

३.२.५ अंड्यांची पर्यायी व्यवस्था ........ २२

३.३ मदर युनिटसाठीचे निष्कर्ष ........ २३

३.३.१ जिल्हानिहाय मदर युनिट निवड ........ २३

३.३.२ मदर युनिट सद्यस्थिती ........ २३

३.३.३ मदर युनिटमधील पक्षी निवारा/घरटी सद्यस्थिती ........ २४

३.३.४ मदर युनिटमध्ये उपलब्ध सुविधा ........ २४

३.३.५ मदर युनिट मालकांच्या प्रशिक्षणा बाबतचा तपशील ........ २५

३.३.६ मदर युनिटकडून टप्पेनिहाय पक्षी वाटपाची संख्या ........ २५

३.३.७ मदर युनिट अंतर्गत सर्व लाभार्थ्यांना योजनेच्या तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरणाबाबत तपशील ........ २६

३.३.८ जिल्हानिहाय मदर युनिट अंतर्गत पक्षांना दिलेल्या लसीकरणाची माहिती ........ २६

३.३.९ मदर युनिट अंतर्गत लसीकरण करणारी यंत्रणा ........ २७

३.३.१० मदर युनिटला खाद्य पुरवठ्यासाठी निधीबाबत तपशील ........ २७

३.३.११ जिल्हानिहाय पुरेसा निधी नसल्यास येणाऱ्या अडचणी ........ २८

३.३.१२ मदर युनिट स्तरावरून लाभार्थ्यांना पुरविलेल्या पक्षांसाठी होणाऱ्या खाद्याचा पुरवठा ........ २८

३.३.१३ पक्षांना रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मिळणारी मदत ........ २८

३.३.१४ मदर युनिट चालकांनी लाभार्थ्यांची अभिलेखे जमा केल्याचा तपशील ........ २९

३.३.१५ मदर युनिटमुळे चालकांस व आदिवासी घटकास झालेल्या फायद्यांचा तपशील ........ २९

३.४ एकात्मिक बाल विकास प्रकल्पासाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष ........ ३०

३.४.१ जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांची निवड ........ ३०

३.४.२ एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांची संख्या ........ ३०

३.४.३ जिल्हानिहाय प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडीला केलेल्या अंड्यांचा पुरवठा ........ ३१

३.५ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) जिल्हा स्तरावरील प्रपत्रातील निष्कर्ष ........ ३२

३.५.१ जिल्हानिहाय महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयांची निवड ........ ३२

३.५.२ जिल्हानिहाय शासनाने निर्धारित केलेले उद्दिष्टे/हेतू साध्य ........ ३२

३.५.३ मदर युनिट धारकांच्या सन २०१७-१८ ते २०२१-२२ कालावधीत झालेल्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील ........ ३३

३.५.४ लाभार्थींच्या सन २०१७-१८ ते २०२१-२२ कालावधीत झालेल्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील ........ ३३

प्रकरण क्र. ४. निष्कर्ष, निरीक्षणे आणि शिफारशी ........ ३४

शासन निर्णय ........ ३६

प्रपत्रे ........ ४५

क्षेत्रभेट क्षणचित्रे ........ ८२

# तक्ते


तक्ता १ : जिल्हानिहाय कुटुंबातील सरासरी सदस्य संख्या ........ ११
तक्ता २ : जिल्हानिहाय लाभार्थी कुटुंबांचा जोडधंदा ........ १२
तक्ता ३ : लाभार्थीच्या स्वतःच्या मालकीच्या शेतजमीनीचा जिल्हानिहाय तपशील ........ १३
तक्ता ४ : लाभार्थ्यांकडे असलेल्या शेतजमीनीचे क्षेत्रफळ ........ १३
तक्ता ५ : जिल्हानिहाय परिचयात्मक एकदिवशीय कार्यशाळा आयोजन ........ १४
तक्ता ६ : जिल्हानिहाय सद्यस्थितीमध्ये सरासरी एकूण उपलब्ध पक्षी ........ १४
तक्ता ७ : वाटप केलेल्या पक्षांकडून लाभार्थीनी घेतलेल्या उत्पन्नाचे स्वरूप ........ १५
तक्ता ८ : जिल्हानिहाय प्राप्त पक्षापासून प्रति दिवस अंडी उत्पादन ........ १५
तक्ता ९ : अंडी विक्री स्थिती ........ १६
तक्ता १० : उत्पादित अंडी विक्री कमी असल्याची कारणे ........ १६
तक्ता ११ : पक्षांचे लसीकरणा बाबतची माहिती ........ १७
तक्ता १२ : पक्षांना लसीकरण करणाऱ्या यंत्रणांचा तपशील ........ १७
तक्ता १३ : पक्षांना लसीकरण न होण्याची कारणे ........ १८
तक्ता १४ : कुक्कुटपालनामुळे लाभार्थीना मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न ........ १८
तक्ता १५ : लाभार्थ्यांना कुक्कुट पालनातून झालेला फायदा ........ १९
तक्ता १६ : जिल्हानिहाय प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला केलेल्या अंड्यांचा पुरवठा ........ २०
तक्ता १७ : प्रकल्पा अंतर्गत प्रति दिवशी अंगणवाडीला केलेल्या अंड्यांचा पुरवठा ........ २१
तक्ता १८ : प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला विहित वेळेत व पुरेशा अंड्यांच्या पुरवठ्याबाबत ........ २१
तक्ता १९ : जिल्हानिहाय मदर युनिटची सद्यस्थिती ........ २३
तक्ता २० : मदर युनिटमधील पक्षी निवारा / घरटी सद्यस्थिती ........ २४
तक्ता २१ : मदर युनिटमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा ........ २४
तक्ता २२ : मदर युनिट मालकांच्या प्रशिक्षणा बाबतचा तपशील ........ २५
तक्ता २३: मदर युनिटकडून टप्पेनिहाय पक्षी वाटप संख्या ........ २५
तक्ता २४ : मदर युनिट अंतर्गत योजनेच्या तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरणाची माहिती ........ २६
तक्ता २५ : जिल्हानिहाय मदर युनिट अंतर्गत पक्षांना केलेल्या लसीकरणाची माहिती ........ २६
तक्ता २६ : मदर युनिट अंतर्गत लसीकरण करणारी यंत्रणा ........ २७
तक्ता २७ : मदर युनिटला पुरेसा खाद्य पुरवठासाठी निधीबाबत माहिती ........ २७
तक्ता २८ : मदर युनिट स्तरावरून लाभार्थ्यांना पुरविलेल्या पक्षांसाठी होणाऱ्या खाद्याचा पुरवठ्याचा तपशील ........ २८
तक्ता २९ : पक्षांना रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मिळणारी मदत ........ २८
तक्ता ३० : जिल्हानिहाय मदर युनिट चालकांनी लाभार्थ्यांची अभिलेखे जमा केल्याचा तपशील ........ २९
तक्ता ३१ : जिल्हानिहाय मदर युनिटमुळे चालकांस व आदिवासी घटकास झालेल्या फायद्यांचा तपशील ........ २९
तक्ता ३२ : जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांची संख्या ........ ३०
तक्ता ३३ : जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांना केलेल्या अंड्यांचा पुरवठा ........ ३१
तक्ता ३४ : जिल्हानिहाय उमेद कार्यालयाने शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टे/हेतू साध्य तपशील ........ ३२
तक्ता ३५ : मदर युनिट धारकांच्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील ........ ३३
तक्ता ३६ : लाभार्थींच्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील ........ ३३



# प्रकरण क्र. १
# स्वयम प्रकल्पाची माहिती

# प्रकरण क्र. १ - स्वयम प्रकल्पाची माहिती

## १.१ प्रकल्प ओळख :

राज्यातील अनुसूचित क्षेत्रामधील कुटुंबांची संतुलित आहाराची गरज लक्षात घेऊन, त्या भागात परसातील कुक्कुट पालन व पशुसंवर्धन विषयक इतर योजना राबविणे तसेच, स्वयंरोजगार निर्मिती करणे आणि त्या कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वसमावेषक एकात्मिक योजना राबविण्यासाठी व राज्यातील आदिवासी कुटुंबांना ग्रामीण परसातील कुक्कुट पालनाद्वारे रोजगार उपलब्ध होऊन अंगणवाडयांमधून पूरक आहाराव्दारे अंडी पुरविण्याची एकात्मिक योजना ही "स्वयम् प्रकल्प" या नावाने आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील १६ जिल्ह्यांमध्ये सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्यात आली.

अनुसूचित क्षेत्रातील कुपोषण कमी करण्याच्या दृष्टिकोनातून अंगणवाडयातील मुलांच्या आहारात अंडयांचा पुरवठा करणे व रोजगार निर्मिती करणे हा या "स्वयम् प्रकल्प" चा मुख्य उद्देश आहे. याकरीता आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि ग्रामविकास विभाग (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) / जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांनी संयुक्तरित्या सदरचा प्रकल्प राबविणेबाबत दिनांक १८.४.२०१७ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रिमंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

राज्याच्या १६ जिल्ह्यांमधील १०४ एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यक्षेत्रात, स्वयम प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामीण परसातील कुक्कुटपालनास चालना देणे, अनुसूचितक्षेत्र / आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांतील मुलांच्या आहारात अंड्यांचा पुरवठा करणे व आदिवासी बांधवांसाठी स्वयं रोजगार निर्मिती करणे अशा बहुविध उद्देशाने स्वयम प्रकल्प राबविण्यात आला.

या महत्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीसाठी, आवश्यक निधी आदिवासी विकास विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात आला. योजनेची अंमलबजावणी पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आली असून; योजनेतील कुक्कुट पक्ष्यांपासून उत्पादीत होणाऱ्या अंड्यांचे संकलन आणि विपणन या बाबी महिला व बालविकास विभागामार्फत करण्यात आल्या. योजनेतील मदर युनिट धारक व लाभार्थ्यांना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांमार्फत कुक्कुट पालनाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. अशा रितीने चार विभागांच्या सहभागातून सदर योजना राबविण्यात आली आहे.

## १.२ योजनेची गरज :

- राज्यातील ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यातील१०४ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांची कार्यक्षेत्रे आदिवासी बहुल आहेत.
- सन १९९१ च्या जनगणने नुसार या १६जिल्ह्यांमधील आदिवासी लोकसंख्या ६२.८० लक्ष होती.
- सन २००१ च्या जनगणने नुसार या १६ जिल्ह्यांची आदिवासी लोकसंख्या ७४.१८ लक्ष होती.
- सन २०११ च्या जनगणने नुसार या १६ जिल्ह्यांची आदिवासी लोकसंख्या ९१.८८ लक्ष होती.
- भारतीय जनगणना अहवालातील लोकसंख्या वाढीच्या, प्रति दशक २२.५ टक्के दराने सध्या या १६ जिल्ह्यांमधील संभाव्य आदिवासी लोकसंख्या ११४.६१ लक्ष इतकी असण्याची शक्यता आहे.
- प्रतिकुटुंब ५ सदस्य गृहित धरल्यास या १६ जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांची संभाव्य संख्या २२.९२ लक्ष इतकी असण्याची शक्यता आहे.
- या १६ जिल्ह्यांमधील आदिवासी लोकसंख्या ४६,२०८ चौ.कि.मी. क्षेत्रात विखुरलेली आहे.

- आदिवासी लोकसंख्येची घनता, प्रति चौरस किलोमीटर क्षेत्रात, अवघी २४८ इतकी होते.
- सन २०१८-१९ मधील एकात्मिक बालविकास विभागाच्या माहे एप्रिल - २०१८ च्या मासिक प्रगती अहवालानुसार या १६ जिल्ह्यांमधील ० ते ५ वयोगटातील एकूण ८,७१,८८७ बालकांचे वजन नोंदवण्यात आले. त्यातील ७,०२,९८७ बालकांचे वजन सर्वसाधारण श्रेणीत होते.
- सर्वसाधारण पेक्षा कमी वजन असणाऱ्या बालकांची संख्या १,३७,२८९ इतकी होती. तर सर्वसाधारण पेक्षा खूप कमी वजन असणाऱ्या बालकांची संख्या ३१,६११ इतकी होती.
- या विस्तीर्ण आदिवासी क्षेत्रातील महिला व ० ते ५ वयोगटातील बालकांच्या सदृढ आरोग्यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. त्यात अंगणवाड्यांमार्फत बालकांना पोषण आहार उपलब्ध करुन देण्यात येतो. या पोषण आहारात उच्च प्रथिनयुक्त आणि जीवनसत्व समृद्ध अंड्यांचा समावेश करण्याच्या हेतूने व आदिवासी बांधवांना स्वयं रोजगाराची संधी व त्याचबरोबर उपजीविकेचे निरंतर साधन उपलब्ध करुन देण्याच्या व्यापक हेतूने, स्वयम् योजना मंजूर करण्यात आली आहे.

## १.३ योजनेचा उद्देश :

१. ग्रामीण परसातील कुक्कुट पालनास चालना देणे.
२. अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाड्यातील बालकांच्या आहारात अंड्यांचा समावेश करणे.
३. आदिवासी बांधवांना स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.
४. आदिवासींना चरितार्थाचे निरंतर स्त्रोत उपलब्ध करुन देणे.

## १.४ योजनेचे उद्दिष्ट :

१. १०४ मदर युनिट्स प्रस्थापित करणे.
२. ४३,३६८ लाभार्थींना सुधारीत देशी प्रजातीच्या चार आठवडे वयाच्या एकूण १९,५१,५६० पक्ष्यांचे मोफत वाटप करणे.

## १.५ योजनेत सहभागी शासन विभाग आणि जबाबदारी व कार्य :

**आदिवासी विकास विभाग**
- विभागाकडून रु. २२५५.७४ लक्ष खर्चाच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली

**पशुसंवर्धन विभाग**
- अंमलबजावणीची जबाबदारी
- एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यक्षेत्रात १ मदर युनिट प्रस्थापित करणे
- मदर युनिटच्या कार्यक्षेत्रात ४१७ आदिवासी लाभार्थींची निवड
- प्रत्येक ; लाभार्थीस एकूण ४५ पक्षी १०० टक्के अनुदानावर वाटप करणे

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)**
- मदर युनिट धारकांसाठी ५ दिवसांचे प्रशिक्षण देणे
- पशु सखी व पशु मित्र यांना ३ दिवसांचे प्रशिक्षण देणे
- लाभार्थीस १ दिवसीय मुलभूत प्रशिक्षण देण्याची जबाबदारी
- त्यामध्ये क्षमता बांधणी व कौशल्य विकास या बाबींचा समावेश

**महिला व बाल विकास विभाग**
- कुक्कुट पालनातून उत्पादीत होणाऱ्या अंड्यांचे संकलन आणि विपणनाची जबाबदारी
- अंगणवाड्यांमधील बालकांच्या आहारात अंड्यांचा समावेश लक्ष्यांकित करणे

## स्वयम् प्रकल्प राबविण्याचे कार्यक्षेत्र :

सदरचा स्वयम् प्रकल्प हा घोषीत करण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रांमधील खालील १६ आदिवासी जिल्हयांमध्ये राबविण्यात आला आहे.

| अ. क्र. | विभाग | जिल्ह्यांची संख्या | जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | कोंकण | ०३ | ठाणे, पालघर व रायगड |
| २ | पुणे | ०१ | पुणे |
| ३ | नाशिक | ०५ | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहमदनगर |
| ४ | अमरावती | ०२ | अमरावती व यवतमाळ |
| ५ | नागपूर | ०४ | नागपूर, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर |
| ६ | लातूर | ०१ | नांदेड |
| **एकूण** | | **१६** | |

## स्वयम प्रकल्पाचे स्वरुप:

या प्रकल्पांतर्गत अनुसूचित क्षेत्र / आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील १६ जिल्हयांमधील एकूण १०४ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रात प्रत्येकी एक युनिट याप्रमाणे १०४ मदर युनिटची (खाजगी पक्षी संगोपन केंद्र) स्थापना करण्यात येणार होती. अंगणवाडयातील मुलांची संख्या विचारात घेऊन, प्रत्येक मदर युनिट यांना सुमारे ४१७ लाभधारकांना संलग्न करण्यात येणार होते. अशा प्रकारे प्रकल्पांतर्गत एकूण ४३,३६८ कुटुंबांना लाभ देण्यात देण्यात येणार होता.

या प्रकल्पांतर्गत मदर युनिटची स्थापना करुन मदर युनिटद्वारे एकदिवशीय देशी सुधारीत जातीचे पिल्ले (Low Input Technology Birds) शासकीय / खाजगी कुक्कुट प्रक्षेत्र येथून प्राप्त करुन घेऊन त्यांचे संगोपन ४ आठवडे वयापर्यंत करण्यात यावे. मदर युनिट धारकांकडून लाभार्थीना पक्षी पुरवठा केल्यानंतर पहिल्या टप्प्यात प्रति पक्षी रु. ५५/-, दुस-या टप्प्यात रु. ५८/- व तिस-या टप्प्यात रु. ६०/- या प्रमाणे रक्कम मदर युनिट धारकास देय राहील. शासनाकडील पूर्वीचे १६ सघन कुक्कुट विकास गट, नव्याने स्थापित होणारे खाजगी भागिदारी तत्वावरील सघन कुक्कुट विकास गट आणि कृषी विज्ञान केंद्रे हे देखील मदर युनिट म्हणून या योजनेमध्ये कार्य करू शकतील, असे निर्देशित करण्यात आले होते.

प्रकल्पांतर्गत निवडलेल्या प्रत्येक कुक्कुट पालक लाभार्थ्यास पक्षांचा निवारा उभारणीस्तव रु. १,५००/- अनुदान देय असून, सदरचे अनुदान प्रत्यक्ष पक्षांचा निवारा उभारणीनंतर अदा करण्यात यावे. तसेच, प्रत्येक लाभार्थ्यास ४ आठवडे वयाचे ४५ पक्षी १०० टक्के अनुदानावर मदर युनिट धारकामार्फत तीन टप्यात पहिल्या टप्यात २० पक्षी, १६ आठवडयानंतर दुस-या टप्यात १५ पक्षी व ३२ आठवड्यानंतर तिस-या टप्यात १० पक्षी वाटप करण्यात यावे, दि. २९ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्देशित करण्यात आले होते.

## प्रकल्पांर्गत विविध घटक :-

या प्रकल्पाचे विविध घटक, प्रमाणक व अंदाजीत किंमत दि. २९ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रमाणक / किंमत | एकुण |
|---|---|---|---|
| १ | मदर युनिट संख्या | १०४ | १०४ मदर युनिट |
| २. | कुक्कूट पालक लाभार्थी संख्या | ४१७ लाभार्थी प्रति मदर युनिट (खाजगी पक्षी संगोपन केद्राशी संलग्न) | ४३,३६८ लाभार्थी |
| ३ | पक्षी निवारा | रु.१५००/-प्रति कुक्कूट पालक लाभार्थी | रु.६५०.५२ लक्ष |

| अ.क्र. | तपशील | प्रमाणक / किंमत | एकुण |
|---|---|---|---|
| ४. | पक्षी वाटप<br>● एक दिवशीय पिल्लांची किंमत -रु.२२/-,<br>● वाहतूक व इतर खर्च-रु.२/-,<br>● मर्तूक-रु.१.५०,<br>● ४ आठवडे पर्यंतचे खाद्य-५००ग्रॅम @) रु.२६/ किलो-रु.१३/-<br>● ब्रुडींग, औषधे, लसिकरण, वाहतूक खर्च-रु.३/-<br>● एकुण किंमत-रु.४१.५० म्हणजेच रु.४२/-<br>● ओव्हर हेडस् ३५ टक्के-रु.१५/-<br>एकूण ४ आठवडे वयाची पक्षांची सरासरी किंमत - रु. ५७ (सदर रक्कमेची परिगणना ही पक्षी वाटपाच्या पहिल्या टप्प्यात रु. ५५, दुस-या टप्प्यात रु. ५८, तिस-या टप्प्यात रु. ६० या प्रमाणे करण्यात आलेली होती.) | ४५ पक्षी प्रति लाभार्थी या प्रमाणे ४३,३६८ लाभार्थींना १९,५१,५६० एवढे पक्षी वाटपा बाबत प्रति पक्षी दयावयाची रक्कम (मदर युनिट धारकास पहिला टप्प्यात रु.५५/-प्रमाणे, दुसरा टप्प्यात रु.५८/- प्रमाणे, तिसरा टप्प्यात रु. ६०/- या प्रमाणे – ३ टप्यात देय राहील ) | रु.११,१४,५५,७६०/- म्हणजेच रु. १११४.५६ लक्ष |
| ५. | मदर युनिट धारकास दयावयाचे अनुदान | रु. ६०,०००प्रति मदर युनिट | रु. ६२.४० लक्ष |
| | एकुण | | रु. १८२७.४८ लक्ष |
| **एकुण ४३३६८ लाभाधारकांचे व यंत्रणेचे प्रशिक्षण व क्षमता बांधणी खर्च** | | | रु. २८२.७५ लक्ष |
| **इतर अकस्मीक व तातडीचे खर्च, योजना मुल्यमापन व सादीलवार खर्च (एकुण प्रकल्पाच्या ५ टक्के)** | | | रु. १०५.५१ लक्ष |
| **राज्य प्रकल्प समन्वयक कक्ष अंदाजे खर्च** | | | रु. ४०.०० लक्ष |
| | | **प्रकल्पाचा एकुण खर्च** | (रु.२११०.२३ लक्ष + रु.१०५.५१ लक्ष + ४०.०० लक्ष)<br>**= रु. २२५५.७४ लक्ष** |

उपरोक्तप्रमाणे नमूद करण्यात आलेले दर हे त्यावेळी म्हणजे सन २०१६-१७ मधील बाजारातील दरांच्या आधारे गृहीत धरण्यात आले आहेत. तसेच ते दि. २९ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आले आहेत.

**प्रकल्प राबविण्याबाबतची कार्यपध्दती:-**

१. आदिवासी विकास विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि ग्रामविकास विभाग (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) / जिल्हा परिषद / जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा) यांचे संयुक्त समन्वयाने प्रकल्प प्रत्यक्षात राबविणा-या क्षेत्रिय अधिका-यांची कार्यशाळा आयोजित करण्यात येते.
२. आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित क्षेत्रातील जिल्हानिहाय प्रकल्प अंमलबजावणीचे क्षेत्र निश्चित (Cluster of villages) करून; प्रकल्पासाठी अंडी उत्पादना पर्यंतचा आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

३. महिला व बाल कल्याण विभागाकडुन अंगणवाडीच्या माध्यमातुन प्रकल्पांतर्गत अंडी संकलन केंद्र निश्चिती करण्यात येतात व उत्पादीत अंडी खरेदी व संकलन, वितरण व देयके अदा करणे इ. कार्यवाही आणि त्यासाठीचा खर्च देखील याच विभागाकडुन त्यांचेकडील अस्तित्वात असलेल्या योजनेतून करण्यात येतो.

४. पशुसंवर्धन विभागाकडून योजनेस प्रसिध्दी देऊन मदर युनिटधारकांचे व लाभ धारकांचे अर्ज मागविण्यात येतात, प्राप्त अर्जातून लाभधारकांची निवड यादी तयार करण्यात येते. तसेच, मदर युनिट धारक निश्चित करण्यात येतात. लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष पक्ष्यांची घरटी उभारणी केल्यानंतरच मदर युनिटकडुन कुक्कुट पक्ष्यांचे वितरण करण्यात येते.

५. ग्रामविकास विभागाकडून (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) / जिल्हा परिषद / जिल्हा ग्रामिणविकास यंत्रणा) निवडलेल्या लाभधारकांची प्रकल्प परिचयात्मक (प्रि-ओरिएन्टेशन) माहितीसाठी कार्यशाळा आयोजीत करण्यात येते, समुदाय साधन व्यक्ती / पशुसखी / पशुमित्र (CRP/TOT/Link Worker) यांची निवड करण्यात येते व प्रशिक्षणाचे नियोजन करुन प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. कुक्कुट पालन व्यवस्थापन विषयक व पक्षी घरटी बांधकामाबाबत मार्गदर्शन इत्यादी बाबीं सदर प्रशिक्षणामध्ये समाविष्ट असतात.

६. या प्रशिक्षण व कौशल्य वृध्दीसाठीचा अंदाजपत्रकीय निधी पशुसंवर्धन विभागाकडून जिल्हा परिषद / महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) / जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडे वर्ग करण्यात येतो.

## १.६ स्वयम प्रकल्पा अंतर्गत जिल्हानिहाय लाभार्थींचा तपशिल

| अ.क्र. | जिल्हा | मदर युनिट संख्या | लाभार्थी संख्या | पुरूष | महिला | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | २ | ८३४ | ५६१ | २५१ | २२ |
| २ | अमरावती | २ | ८३४ | ५६१ | २५० | २३ |
| ३ | चंद्रपूर | ११ | ४५८७ | ३०८१ | १३७७ | १२९ |
| ४ | धुळे | ३ | १२५१ | ८४० | ३७८ | ३३ |
| ५ | गडचिरोली | १२ | ५००४ | ३३५३ | १५०६ | १४५ |
| ६ | गोंदिया | ३ | १२५१ | ८३४ | ३७७ | ३६ |
| ७ | जळगाव | ३ | १२५१ | ८३८ | ३७७ | ३६ |
| ८ | नागपूर | १ | ४१७ | २८० | १२५ | १२ |
| ९ | नांदेड | २ | ८३४ | ५६० | २५० | २४ |
| १० | नंदुरबार | १२ | ५००४ | ३३६४ | १५०१ | १३९ |
| ११ | नाशिक | १४ | ५८३८ | ३९१६ | १७५५ | १६७ |
| १२ | पुणे | ४ | १६६८ | ११२० | ५०२ | ४६ |
| १३ | रायगड | २ | ८३४ | ५६३ | २४९ | २२ |
| १४ | पालघर | १२ | ५००४ | ३३६० | १५०० | १४४ |
| १५ | ठाणे | ६ | २५०२ | १६८० | ७५० | ७२ |
| १६ | यवतमाळ | ११ | ३८५० | २५४० | १२०३ | १०७ |
| एकूण | | १०० | ४०,९६३ | २७,४५१ | १२,३५६ | १,१५६ |

(स्त्रोत -: पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र)

उपरोक्त तक्त्या नुसार स्वयंम प्रकल्पा अंतर्गत एकूण ४०,९६३ इतक्या लाभार्थींना लाभ मिळालेला असून त्यापैकी २७,४५१ (६७.०१%) इतके पुरूष लाभार्थी, १२,३५६ (३०.१५%) महिला लाभार्थी तर १,१५६ (२.८२%) दिव्यांग लाभार्थी आहेत. अधिकतम उद्दिष्ट्य साध्य जिल्हा नाशिक हा असून न्यूनतम उद्दिष्ट्य साध्य जिल्हा नागपूर हा आहे.




# प्रकरण क्र. २
# दृष्टीकोन आणि मूल्यमापन कार्यपध्दती

# प्रकरण क्र. २ - दृष्टीकोन आणि पध्दती

ग्रामीण परसातील कुक्कुटपालनास चालना देणे, अनुसूचित क्षेत्र व आदिवासी क्षेत्रातील अंगणवाड्यांमधील बालकांच्या आहारात अंड्यांचा पुरवठा करणे, अनुसूचित क्षेत्रातील लाभार्थीस स्वयं रोजगाराचे व त्या योगे निरंतर चरितार्थाचे साधन उपलब्ध करून देणे अशा बहुविध उद्देशाने हा प्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे.

पशुसंवर्धन आयुक्तालयाने सदर प्रकल्पाची निष्पत्ती जाणून घेण्याच्या दृष्टीकोनातून दि. २७/०३/२०२० रोजीच्या पत्राव्दारे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना प्रकल्पाचे विश्लेषणात्मक मूल्यमापन करण्याबाबत कळविले होते. ग्रामीण परसातील कुक्कुट पालनास चालना देणे, आदिवासी/अनुसूचित क्षेत्रातील लाभार्थींना स्वयं रोजगाराचे साधन तसेच निरंतर चरितार्थाचा स्त्रोत उपलब्ध करून देणे आणि आहारातील पोषण मूल्यात वृध्दी घडवून आणणे या बाबीं संदर्भात सदर प्रकल्पातून साध्य झालेल्या उद्दिष्टांचे मूल्यमापन करून त्याबाबत अहवाल देणे अपेक्षित होते.

नियोजन विभागाच्या शासन निर्णयानुसार योजनांच्या मूल्यमापन पाहणीसाठी तयार करण्यात आलेल्या नामांकित बाह्यस्थ संस्थांच्या नामिका सूचीतील एएफसी इंडिया लिमीटेड (AFC INDIA LTD) या संस्थेची स्वयंम प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी विहीत पध्दतीने निवड करण्यात आली. मूल्यमापनाच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने एएफसी इंडिया लिमीटेड संस्थेने प्रश्नावली, माहिती कोष्टके इत्यादी तयार करून प्रश्नावलीच्या माध्यमातुन, विहीत नमुना निविड पध्दतीने निवड केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी मधील विविध घटकांना (लाभार्थी, मदर युनिट, अंगणवाडी, पशुसंवर्धन कार्यालय इ.) प्रत्यक्ष भेटी देवून, अन्वेषकांद्वारे विहीत प्रपत्रात माहिती संकलित केली. सदर माहितीवरील विश्लेषणाच्या आधारे स्वयंम प्रकल्पाचे अहवाल लेखन करण्यात आलेले आहे.

## २.१ मुल्यमापनाची उद्दिष्टे

१. स्वयम प्रकल्पामुळे आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील आदिवासींमध्ये कुक्कुट पालनास चालना मिळाली आहे का, याचा शोध घेणे.
२. आदिवासी लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराचे साधन व निरंतर चरितार्थाचा स्त्रोत उपलब्ध झाला आहे की नाही, याचा शोध घेणे.
३. सदर प्रकल्पामुळे लाभार्थी कुटुंबांच्या आर्थिक उत्पन्न वाढीचा शोध घेणे.
४. सदर प्रकल्पाव्दारे अंगणवाड्यांना अंडयांचा पुरवठा होतो कि नाही याचा शोध घेणे.
५. आंगणवाडीमधील मुलांना अंड्यांच्या पुरवठ्यामुळे त्यांच्या आहारातील पोषणमुल्यात झालेल्या वृद्धीचा शोध घेणे.
६. सदर प्रकल्पाची प्राथमिक स्तरावर झालेल्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये आलेल्या त्रुटींचा शोध घेणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

## २.२ नमुना निवड

सदर मुल्यमापन अभ्यासासाठी एकूण ८ जिल्ह्यांची (अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, नंदुरबार, नाशिक, पालघर, ठाणे व यवतमाळ) निवड करण्यात आली.

मा. आयुक्त यांच्या कार्यालयातून प्राप्त झालेल्या विविध कार्यान्वयीन यंत्रणांकडून कार्यान्वित केलेल्या कामांच्या माहितीनुसार मुल्यमापन संस्थेने प्रत्यक्ष ९९६ प्रश्नावलीमध्ये विविध कार्यालयाकडून तसेच प्रत्यक्ष लाभार्थी यांना जुलै २०२२ ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत मूल्यमापन / पडताळणी भेटी देऊन प्रत्यक्ष माहिती संकलन केलेले आहे. उपलब्ध असलले लाभार्थी तसेच भेटी दरम्यान उपस्थित असलेल्या कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीची प्रश्नावलीमध्ये नोंद करण्यात आली. तसेच लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष कुक्कुट पालन पक्षी

युनिटला भेट देण्यात देण्यात आली आहे. पडताळणी भेटी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबींची प्रश्नावलीमध्ये नोंद करण्यात आली आहे.

## २.३ माहिती संकलन आणि विश्लेषण

सदर मुल्यमापन अभ्यासासाठी एकूण ८ जिल्ह्यांची (अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, नंदुरबार, नाशिक, पालघर, ठाणे व यवतमाळ) निवड करण्यात आली. सदर मूल्यमापन अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या एकूण ८ जिल्ह्यांमध्ये एकात्मिक बाल विकास प्रकल्प १५, मदर युनिट १६. अंगणवाड्या ३०३ व लाभार्थी ६३० तसेच पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय १, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प १५ व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय ८, ग्राम विकास विभागाकडून (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालय ८, अशी एकूण ९९६ प्रपत्रात माहिती संकलित करण्यात आली.

प्रकल्पाचा सामाजिक-आर्थिक प्रभाव आणि लाभ तसेच फायदे-तोटे जाणून घेण्यासाठी लाभार्थ्यांच्या गट चर्चा (FGD) द्वारे कुक्कुट पालनाचा तपशील ही गोळा केला. तसेच भेटीच्या वेळची कुक्कुट पालनाच्या प्रत्यक्ष शेड ला भेट देऊन प्राथमिक माहितीचे संकलन केले गेले.

तसेच विविध यंत्रणाच्या माध्यमातून केलेल्या कार्याचा अहवाल/दुय्यम स्वरुपाची माहिती वरील नमूद सर्व संबधित कार्यालयामधून संकलित करण्यात आली.

## २.४ नियोजित वर्णनात्मक साधने

परिमाणात्मक डेटा/माहिती, सोप्या विश्लेषण पद्धतीचा वापर करून प्रक्रिया केली गेली आहे. जसे की वारंवारिता (frequency), टक्केवारी (Percentage) आणि आकडेवारीमध्ये सादर केलेले परिणाम सारण्या (Pivot Tables), आलेख आणि तक्ते (Graph & Chart) इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे. वर्णनात्मक माहिती, उत्पादन प्रणालीची तुलना करण्यासाठी आणि प्रकल्पात वापरण्यात आलेल्या पद्धतींचे वैशिष्ट्य स्पष्ट करण्यासाठी वापरली आहे. संख्यात्मक विश्लेषण इतर संबंधित निर्देशकांसाठी वापरले आहेत.

## २.५ अभ्यास व्याप्ती

मूल्यमापन अभ्यासाचा संपूर्ण उद्देश लक्ष विशेष अभ्यास केंद्रित आहे; जी आदिवासींमध्ये कुक्कुट पालनास चालना आणि आहारातील पोषणमुल्यात वाढ होण्यासह गुणवत्तात्मक पद्धतीने पूरक परिमाणवाचक दृष्टिकोणासह वापरण्याच्या पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. त्यामध्ये खालील बाबींचा विशेष अभ्यास करण्यात आला आहे.

- प्रकल्प क्षेत्रामधील आदिवासी लाभार्थीन मध्ये कुक्कुट पालनास चालना मिळाली आहे का?
- आदिवासी लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराचे साधन व निरंतर चरितार्थाचा स्त्रोत उपलब्ध झाला आहे का?
- सदर प्रकल्पामुळे लाभार्थी कुटुंबांच्या आर्थिक उत्पन्न वाढीस चालना मिळाली आहे का?.
- सदर प्रकल्पाव्दारे अंगणवाड्यांना अंडयांचा पुरवठा होतो का?
- आंगणवाडीमधील मुलांना अंड्यांच्या पुरवठ्यामुळे त्यांच्या आहारातील पोषणमुल्यात वाढ झाली आहे का?
- सदर प्रकल्पाची प्राथमिक स्तरावर झालेल्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.
- प्रकल्प क्षेत्रामधील आदिवासींचे प्रकल्पा बद्दल अभिप्राय / मत.

## २.६ प्रक्षेत्र भेटी

अभ्यासगटाने जुलै २०२२ ते ऑगस्ट २०२२ दरम्यान मूल्यमापन भेटीचा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रक्षेत्र पडताळणी भेटी दरम्यान विशेषज्ञ निरिक्षणे आणि निष्कर्ष एकत्रितपणे अभ्यासगटातील सर्व सदस्यांमध्ये चर्चा करून गटनायकाच्या मदतीने अंतिम करण्यात आली. प्रत्येक लाभार्थ्याची/कार्यालयाच्या कामाची निरिक्षणे, निष्कर्ष, माहिती, शिफारशींसह क्षेत्रभेटीच्या आधारे अहवालामध्ये समाविष्ट केली गेली आहेत.

## २.७ अहवालाची संरचना

हा अहवाल दोन भागांमध्ये (१: मुख्य अहवाल आणि २: प्रपत्रे व जोडपत्रे) तयार करण्यात आला आहे. या अहवालाचे प्रकरण/अध्याय-वार तपशील खालीलप्रमाणे आहेत.

## भाग १ मुख्य अहवाल

प्रकरण -१: प्रकल्पाची माहिती व प्रस्तावना

प्रकरण - २: दृष्टीकोन आणि पद्धती

प्रकरण - ३: विश्लेषण

प्रकरण -४: निष्कर्ष, निरीक्षणे आणि शिफारशी

## भाग २ प्रपत्रे

परिशिष्ट -१: प्रश्नावली/प्रपत्र

## २.८ अहवालाची उपयुक्तता

सदर अहवाल हा कार्यान्वयीन यंत्रणांनी केलेल्या कामात अथवा एकूणच प्रकल्प यशस्वी होण्यास योग्य आवश्यक पावले उचलण्यास मदत करेल. ज्यामुळे प्रकल्प आदिवासी समाजासाठी अधिक आर्थिकदृष्ट्या फायदेशीर, आहारातील पोषण मुल्ये मूल्यवर्धित करणे, प्राथमिक स्तरावर अंमलबजावणी करणे, नंतरच्या स्थितीत परिणाम-मूल्यांकनासाठी आधारभूत रेखा निश्चित करणे इ.साठी उपयुक्त ठरेल.

## २.९ मूल्यमापनासाठी भरण्यात आलेली पत्रके

प्रपत्र – १ : पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र यांसाठीचे

सदर प्रपत्रातील माहिती स्वयम प्रकल्पाचे कामकाज करत असलेल्या सहकारी/ कर्मचारी यांचेकडून घेण्यात आली.

प्रपत्र – २ : क्षेत्र स्तरावरील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांसाठीचे

सदर प्रपत्रातील माहिती ही एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील स्वयम प्रकल्पाचेक्षेत्र स्तरावरील कामकाज पाहत असलेल्या सहकारी/ कर्मचारी यांचेकडून घेण्यात आली.

प्रपत्र – ३ : क्षेत्र स्तरावरील जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय यांसाठीचे

सदर प्रपत्रातील माहिती ही जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयातील स्वयम प्रकल्पाचे क्षेत्र स्तरावरील कामकाज पाहत असलेल्या सहकारी/ कर्मचारी यांचेकडूनघेण्यात आली.

प्रपत्र – ४ : क्षेत्र स्तरावरील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय यांसाठीचे

सदर प्रपत्रातील माहिती ही एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयातील स्वयम प्रकल्पाचे क्षेत्र स्तरावरील कामकाज पाहत असलेल्या सहकारी/ कर्मचारी यांचेकडून घेण्यात आली.

प्रपत्र – ५ : क्षेत्र स्तरावरील अंगणवाडीसाठीचे

सदर प्रपत्रातील माहिती ही अंगणवाडी सेविका/ मदतनीस यांचेकडून घेण्यात आली.

प्रपत्र – ६ : क्षेत्र स्तरावरील (तालुका) मदर युनिटयांसाठीचे

सदर प्रपत्रातील माहिती मदर युनिटचे मालक/चालकयांचे कडून घेण्यात आली.

प्रपत्र – ७ : स्वयम प्रकल्पाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांसाठीचे

सदर प्रपत्रातील माहिती हीस्वयम प्रकल्पाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांकडून घेण्यात आली.

प्रपत्र – ८ : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) जिल्हा स्तरावरील कार्यालयासाठीचे

सदर प्रपत्रातील माहिती ही महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयातील स्वयम प्रकल्पाचे कामकाज पाहत असलेल्या सहकारी/ कर्मचारी यांचे कडून घेण्यात आली.

# प्रकरण क्र. ३
# विश्लेषण



# प्रकरण क्र. ३ - विश्लेषण

सदर मुल्यमापन अभ्यासासाठी एकूण ८ जिल्ह्यांची (अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, नंदुरबार, नाशिक, पालघर, ठाणे व यवतमाळ) निवड करण्यात आली.

सदर मूल्यमापन अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या एकूण ८ जिल्ह्यांमध्ये एकात्मिक बाल विकास प्रकल्प १५, मदर युनिट १६, अंगणवाड्या ३०३ व लाभार्थी ६३० तसेच पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय १, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प १५ व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय ८, ग्राम विकास विभाग (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालय ८, अशी एकूण ९९६ प्रपत्रात माहिती संकलित करण्यात आली. या सर्व ९९६ प्रपत्रातील माहितीचा या मूल्यमापन अहवालात समावेश करण्यात आला आहे.

ह्या प्रकरणामध्ये प्रपत्र निहाय निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

## ३.१ लाभार्थ्यांसाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष

स्वयम प्रकल्पाचा लाभ घेतलेल्या ६३० लाभार्थ्यांकडून विहीत प्रपत्रात माहिती घेतलेली आहे. सदर प्रकल्पामुळे त्यांना उपलब्ध झालेले उपजीविकेचे साधन, उत्पन्नात झालेली वाढ, पोषण आहाराचा स्त्रोत, तसेच प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी उपाययोजना याबाबत माहिती घेण्यात आली. स्वयम प्रकल्पाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांसाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

### ३.१.१ जिल्हानिहाय लाभार्थी निवड

स्वयम प्रकल्पा अंर्तगत ८ जिल्ह्यांमधील एकूण ६३० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यापैकी अमरावती जिल्हा वगळता इतर सर्व जिल्ह्यातील प्रत्येकी ८४ (१३.३३%) लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. तर अमरावती जिल्ह्यातील ४२ (६.६७%) लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. खालील आकृती १ मध्ये जिल्हानिहाय लाभार्थी निवड दर्शवण्यात आली आहे.




**आकृती १ : जिल्हानिहाय लाभार्थी निवड**

## ३.१.२ जिल्हानिहाय संवर्ग निहाय लाभार्थी संख्या

स्वयम प्रकल्पा अंर्तगत ८ जिल्ह्यांमधील एकूण ६३० लाभार्थ्यांची माहिती घेण्यात आली. त्यापैकी ६११ (९६.९८%) लाभार्थी हे अनुसूचित जमाती या सवर्गातील असून इतर मागास वर्ग या संवर्गातील लाभार्थी संख्या १४ (२.२२%) इतकी आहे. तर अनुसूचित जातीतील लाभार्थी संख्या ५ (०.७९%) इतकी आहे. खालील आकृती २ मध्ये जिल्हानिहाय संवर्ग निहाय लाभार्थी संख्या दर्शवण्यात आली आहे.




आकृती २ : जिल्हानिहाय संवर्ग निहाय लाभार्थी संख्या

## ३.१.३ जिल्हानिहाय सरासरी कुटुंब सदस्य संख्या

जिल्हानिहाय सरासरी कुटुंब संख्या पाहिली असता कुटुंबातील सरासरी एकूण सदस्य संख्या ही ५ दिसून येते. जिल्हानिहाय विचार करता असे दिसून येते की गडचिरोली आणि ठाणे येथे कुटुंबातील सरासरी एकूण सदस्य संख्या ही सर्वाधिक म्हणजेच ६ आहे. तसेच चंद्रपूर येथे कुटुंबातील सरासरी एकूण सदस्य संख्या ही सर्वात कमी म्हणजे ४ दिसून येते. अमरावती, नंदुरबार, नाशिक, पालघर आणि यवतमाळ येथे कुटुंबातील सरासरी एकूण सदस्य संख्या ही ५ दिसून येते. खालील तक्ता १ मध्ये कुटुंबातील सरासरी एकूण सदस्य संख्या दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | कुटुंबातील सरासरी सदस्य संख्या |
|---|---|
| अमरावती | ५ |
| गडचिरोली | ६ |
| चंद्रपूर | ४ |
| ठाणे | ६ |
| नंदुरबार | ५ |
| नाशिक | ५ |
| पालघर | ५ |
| यवतमाळ | ५ |

तक्ता १ : जिल्हानिहाय कुटुंबातील सरासरी सदस्य संख्या

### ३.१.४ जिल्हानिहाय लाभार्थी कुटुंबांचा मुख्य व्यवसाय आणि प्रमुख आर्थिक साधन

लाभार्थी कुटुंबाचा मुख्य व्यवसाय आणि मुख्य आर्थिक साधनांचा विचार केला असता असे दिसून येते की; ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक शेतमजुरी आणि रोजंदारी करणारी कुटुंबे असून तेच त्यांचे आर्थिक कमाईचे प्रमुख साधन आहे. तसेच पालघर जिल्ह्यात सर्वाधिक शेती करणारी कुटुंबे असून तेच त्यांचे आर्थिक कमाईचे प्रमुख साधन आहे. तर फक्त रोजंदारीवर अवलंबून असणारी सर्वाधिक कुटुंबे ही नंदुरबार जिल्ह्यात दिसून आली. खालील आकृती ३ मध्ये जिल्हानिहाय लाभार्थी कुटुंबाचा मुख्य व्यवसाय आणि प्रमुख आर्थिक साधनांची माहिती दर्शवण्यात आली आहे.




**आकृती ३ : जिल्हानिहाय लाभार्थी कुटुंबांचा मुख्य व्यवसाय आणि प्रमुख आर्थिक साधन**

### ३.१.५ जिल्हानिहाय लाभार्थी कुटुंबांचा जोडधंदा

लाभार्थी कुटुंबाच्या जोडधंद्याचा विचार केला असता असे दिसून येते की; १८२ लाभार्थी हे स्वत:चा आर्थिक स्तर उंचवण्यासाठी जोडधंदा करतात. त्यात सर्वाधिक १७१ कुटुंबांचा पशुपालन हा जोडधंदा असल्याचे निदर्शनास आले. तसेच कुक्कुटपालन, शेळीपालन आणि इतर व्यवसाय म्हणजे प्लंबर, किराणा दुकान आणि गाडी दुरुस्ती असे लहान जोडधंदे करणारी एकूण ११ कुटुंबे आहेत. खालील तक्ता २ मध्ये लाभार्थी कुटुंबाच्या जोडधंद्याची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | मुख्य व्यवसाया व्यतिरिक्त कुटुंबाचा जोडधंदा कोणता? | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पशुपालन | कुक्कुटपालन | शेळीपालन | इतर व्यवसाय | एकूण |
| **अमरावती** | ४२ | - | - | - | ४२ |
| **गडचिरोली** | १ | - | - | - | १ |
| **चंद्रपूर** | - | - | १ | १ | २ |
| **ठाणे** | - | १ | - | - | १ |
| **नंदुरबार** | ८४ | - | - | - | ८४ |
| **नाशिक** | १ | ३ | २ | ३ | ९ |
| **पालघर** | १ | - | - | - | १ |
| **यवतमाळ** | ४२ | - | - | - | ४२ |
| **एकूण** | **१७१** | **४** | **३** | **४** | **१८२** |

**तक्ता २ : जिल्हानिहाय लाभार्थी कुटुंबांचा जोडधंदा**

### ३.१.६ लाभार्थीच्या स्वतःच्या मालकीच्या शेतजमीनीचा जिल्हानिहाय तपशील

लाभार्थीच्या स्वतःच्या मालकीची शेतजमीनीचा विचार केला असता असे दिसून येते की; एकूण ६३० लाभार्थ्यांपैकी ३५६ (५६.५०%) लाभार्थ्यांकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन आहे. नंदुरबार जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजेच ६ लाभार्थ्यांकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन आहे. तर पालघर जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजेच ७९ लाभार्थ्यांकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन आहे. खालील तक्ता ३ मध्ये लाभार्थी कुटुंबाकडील स्वतःच्या मालकीची शेतजमीन दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | आपल्याकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन आहे काय ? | | |
|---|---|---|---|
| | स्वतःच्या मालकीची शेतजमीन असलेले लाभार्थी | स्वतःच्या मालकीची शेतजमीन नसलेले लाभार्थी | एकूण |
| **अमरावती** | ९ | ३३ | ४२ |
| **गडचिरोली** | ५९ | २५ | ८४ |
| **चंद्रपूर** | ४१ | ४३ | ८४ |
| **ठाणे** | ७७ | ७ | ८४ |
| **नंदुरबार** | ६ | ७८ | ८४ |
| **नाशिक** | ६७ | १७ | ८४ |
| **पालघर** | ७९ | ५ | ८४ |
| **यवतमाळ** | १८ | ६६ | ८४ |
| **एकूण** | **३५६** | **२७४** | **६३०** |

**तक्ता ३ : लाभार्थीच्या स्वतःच्या मालकीच्या शेतजमीनीचा जिल्हानिहाय तपशील**

### ३.१.७ शेतजमीनीचे क्षेत्रफळ

लाभार्थीच्या स्वतःच्या मालकीची शेतजमीनीचा विचार केला असता असे दिसून येते की; एकूण शेतजमीन असलेल्या ३५६ लाभार्थ्यांपैकी केवळ ३३(९.२७%) लाभार्थ्यांकडे ५ एकर किंवा पेक्षा जास्त शेतजमीन आहे. त्यात चंद्रपूर जिल्ह्यातील १४ लाभार्थी आहेत. तर १ एकर पेक्षा कमी मालकीची शेतजमीन असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ही सर्वाधिक १३४ (३७.५६%) इतकी आहे. खालील तक्ता ४ मध्ये लाभार्थी कुटुंबाकडील स्वतःच्या मालकीच्या शेत जमीनीचे क्षेत्रफळ दर्शवण्यात आले आहे.

| जिल्हा | शेत जमीनीचे क्षेत्रफळ किती? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ एकर पेक्षा कमी | १ एकर | २ एकर | ४ एकर | ५ एकर किंवा पेक्षाजास्त | एकूण |
| **अमरावती** | - | १ | ८ | - | - | ९ |
| **गडचिरोली** | १३ | १२ | २२ | ५ | ७ | ५९ |
| **चंद्रपूर** | १ | ६ | ८ | १२ | १४ | ४१ |
| **ठाणे** | ३५ | ३६ | ४ | २ | - | ७७ |
| **नंदुरबार** | - | १ | ३ | - | २ | ६ |
| **नाशिक** | २२ | ३३ | ९ | २ | १ | ६७ |
| **पालघर** | ६३ | १३ | ३ | - | - | ७९ |
| **यवतमाळ** | - | - | ७ | २ | ९ | १८ |
| **एकूण** | **१३४** | **१०२** | **६४** | **२३** | **३३** | **३५६** |

**तक्ता ४ : लाभार्थ्यांकडे असलेल्या शेतजमीनीचे क्षेत्रफळ**

### ३.१.८ परिचयात्मक एकदिवशीय कार्यशाळा आयोजनाबाबत जिल्हानिहाय तपशील

लाभार्थींना परिचयात्मक एकदिवशीय कार्यशाळा आयोजना बाबत विचारले असता ३०८ लाभार्थ्यांनी कार्यशाळेचे नियोजन केल्याचे मत व्यक्त केले. २०१ लाभार्थ्यांनी कार्यशाळेचे नियोजन केले गेले नसल्याचे मत आहे. तर १२१ लाभार्थींनी कार्यशाळेचे आयोजन केल्याचे माहिती नाही असे मत व्यक्त केले. खालील तक्ता ५ मध्ये जिल्हानिहाय परिचयात्मक एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन केल्याची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | स्वयम प्रकल्पांतर्गत लाभार्थी म्हणून आपली निवड झाल्यानंतर आपणासाठी प्रकल्प परिचयात्मक एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती काय ? | | |
|---|---|---|---|
| | एकदिवशीय कार्यशाळा आयोजित केली असल्याचे नमूद केलेले लाभार्थी | एकदिवशीय कार्यशाळा आयोजित केली नसल्याचे नमूद केलेले लाभार्थी | आयोजन केल्याचे माहिती नाही |
| **अमरावती** | ४२ | - | - |
| **गडचिरोली** | ४ | ८० | - |
| **चंद्रपूर** | २ | ३३ | ४९ |
| **ठाणे** | ७३ | १ | १० |
| **नंदुरबार** | १२ | ४८ | २४ |
| **नाशिक** | ८४ | - | - |
| **पालघर** | ८४ | - | - |
| **यवतमाळ** | ७ | ३९ | ३८ |
| **एकूण** | **३०८** | **२०१** | **१२१** |

**तक्ता ५ : जिल्हानिहाय परिचयात्मक एकदिवशीय कार्यशाळा आयोजन**

### ३.१.९ सद्यस्थितीमध्ये सरासरी एकूण उपलब्ध पक्षी

मूल्यमापन भेटी दरम्यान लाभार्थीकडे सद्यस्थितीमध्ये उपलब्ध असलेले पक्ष्यांबद्दल माहिती घेतली असता असे दिसून आले की; गडचिरोली जिल्ह्यात सद्यस्थितीमध्ये सर्वात कमी म्हणजेच सरासरी १ पक्षी लाभार्थी कडे उपलब्ध असल्याचे आढळून आले. तर ठाणे जिल्हयात सर्वाधिक म्हणजेच सरासरी ४७ पक्षी लाभार्थी कडे उपलब्ध असल्याचे आढळून आले. तर नाशिक आणि पालघर जिल्ह्यात प्रत्येकी सरासरी २९ पक्षी लाभार्थी कडे उपलब्ध असल्याचे आढळून आले. खालील तक्ता ६ मध्ये लाभार्थ्यांकडे सद्यस्थितीत उपलब्ध पक्षांची सरासरी दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | सद्यस्थितीमध्ये सरासरी एकूण उपलब्ध पक्षी |
|---|---|
| **अमरावती** | ८ |
| **गडचिरोली** | १ |
| **चंद्रपूर** | २ |
| **ठाणे** | ४७ |
| **नंदुरबार** | ७ |
| **नाशिक** | २९ |
| **पालघर** | २९ |
| **यवतमाळ** | २ |
| **सरासरी एकूण उपलब्ध पक्षी** | **१५** |

**तक्ता ६ : जिल्हानिहाय सद्यस्थितीमध्ये सरासरी एकूण उपलब्ध पक्षी**

### ३.१.१० वाटप केलेल्या पक्षांकडून घेतलेल्या उत्पन्नाचे स्वरूप

जिल्हानिहाय लाभार्थींना पक्षी वाटप करण्या पश्चात घेतलेल्या उत्पादना बाबत विचारले असता; १७२ लाभार्थी हे प्रामुख्याने अंड्यांची खुल्या बाजारपेठेत विक्री करण्यासाठी पक्षांचा वापर करत असल्याचे आढळले. १०० लाभार्थ्यांनी प्रामुख्याने पक्षी विक्रीतून उत्पन्न घेतल्याचे मत व्यक्त केले. तर २४६ लाभार्थ्यांनी पक्षांकडून मिळालेल्या उत्पन्नाचा वापर हा स्वत:च्या कुटुंबासाठी केला असल्याचे मत व्यक्त केले. खालील तक्ता ७ मध्ये वाटप केलेल्या पक्षांकडून घेतलेल्या उत्पन्नाच्या स्वरूपाबाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | वाटप केलेल्या पक्षांकडून कोणत्या स्वरूपाचे उत्पन्न घेता? | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अंडी घेणे | पक्षी विक्री | अंडी घेणे, पक्षी विक्री | अंडी घेणे, पिल्ले तयार करणे, पक्षी विक्री | पिल्ले तयार करणे | पिल्ले तयार करणे, पक्षी विक्री | स्वत:च्या कुटुंबासाठी वापर | एकूण |
| अमरावती | ६ | २३ | १ | - | ३ | - | ९ | ४२ |
| गडचिरोली | ४ | ५ | ५ | - | - | - | ७० | ८४ |
| चंद्रपूर | - | ३९ | ३६ | - | - | - | ९ | ८४ |
| ठाणे | १५ | ५ | १७ | १ | - | - | ४६ | ८४ |
| नंदुरबार | ३१ | २ | १८ | ७ | - | १ | २५ | ८४ |
| नाशिक | ३१ | - | ७ | ४ | - | - | ४२ | ८४ |
| पालघर | ७६ | १ | १ | - | - | - | ६ | ८४ |
| यवतमाळ | ९ | २५ | २ | ४ | ३ | २ | ३९ | ८४ |
| एकूण | **१७२** | **१००** | **८७** | **१६** | **६** | **३** | **२४६** | **६३०** |

**तक्ता ७ : वाटप केलेल्या पक्षांकडून लाभार्थींनी घेतलेल्या उत्पन्नाचे स्वरूप**

### ३.१.११ प्राप्त पक्षांपासून प्रति दिवस अंडी उत्पादन

प्रति लाभार्थी ४५ पक्षांमागे प्रति दिन सरासरी १५ हून कमी अंड्यांचे उत्पादन होत असल्याचे दिसून येते, यावरून लाभार्थींचा कल अंडी उत्पादना व्यतिरीक्त पक्षी विक्री किंवा पक्षांचा खाद्य म्हणून वापर करण्याकडे दिसून येतो.

खालील तक्ता ८ मध्ये लाभार्थींना वाटप केलेल्या पक्षांकडून घेतलेल्या अंडी उत्पन्नाबाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | प्राप्त पक्षांपासून आपणास प्रति दिवस किती अंडी उत्पादन मिळते ? |
|---|---|
| | प्राप्त पक्षापासून प्रति दिवस अंडी उत्पादन |
| अमरावती | ५ |
| गडचिरोली | १ |
| चंद्रपूर | ४ |
| ठाणे | ६ |
| नंदुरबार | ४ |
| नाशिक | १२ |
| पालघर | ३ |
| यवतमाळ | ३ |
| सरासरी प्रति युनिट | **५** |

**तक्ता ८ : जिल्हानिहाय प्राप्त पक्षापासून प्रति दिवस अंडी उत्पादन**

## ३.१.१२ जिल्हानिहाय अंडी विक्री स्थिती

अंडी विक्रीबाबत लाभार्थींना प्रश्न केला असता; असे आढळून आले की,फक्त ४ लाभार्थीच आपल्याकडील उत्पादित अंडी अंगणवाडीस विक्री करतात. सर्वाधिक लाभार्थी हे अंडी विक्री न करता स्वतः साठीच अथवा कुटुंबासाठी उत्पादित अंड्यांचा वापर करतात. तर ६८ लाभार्थी हे किरकोळ विक्री आणि २० लाभार्थी हे खुल्या बाजारात अंडी विक्री करतात. जिल्हानिहाय विचार करता; अमरावती, गडचिरोली, नंदुरबार आणि यवतमाळ ह्या जिल्ह्यातील एकही लाभार्थी आपल्याकडील अंड्यांचे उत्पादन अंगणवाडीस विक्री करत नाही. खालील तक्ता ९ मध्ये जिल्हानिहाय अंडी विक्री सद्यस्थिती बाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | उत्पादित अंडी कुणाला विकता ? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अंगणवाडी | किरकोळ विक्री | खुल्या बाजारात | विकत नाही | उत्पन्न घेतले नाही | एकूण |
| **अमरावती** | - | १० | १४ | ९ | ९ | ४२ |
| **गडचिरोली** | - | - | १ | १३ | ७० | ८४ |
| **चंद्रपूर** | १ | ११ | - | ६३ | ९ | ८४ |
| **ठाणे** | १ | - | १ | ३६ | ४६ | ८४ |
| **नंदुरबार** | - | २० | २ | ३७ | २५ | ८४ |
| **नाशिक** | १ | १५ | १ | २५ | ४२ | ८४ |
| **पालघर** | १ | १ | १ | ७५ | ६ | ८४ |
| **यवतमाळ** | - | ११ | - | ३४ | ३९ | ८४ |
| **एकूण** | **४** | **६८** | **२०** | **२९२** | **२४६** | **६३०** |

**तक्ता ९ : अंडी विक्री स्थिती**

## ३.१.१३ अंडी विक्री कमी असल्याची कारणे

प्रकल्पा अंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना अंडी विक्री न करण्याबाबत प्रश्न केला असता; असे निदर्शनास आले की, २९२ लाभार्थ्यांपैकी २३६ लाभार्थी हे आपल्याकडील उत्पादित अंडी विक्री न करता स्वतः साठीच अथवा कुटुंबासाठी वापर करतात. तर ४९ लाभार्थ्यांनी एकूण अंडी उत्पादन कमी असल्यामुळे अंडी विक्री करत नाही असे मत व्यक्त केले. ५ लाभार्थ्यांनी मरतुकीमुळे कोंबड्या मेल्याचे मत व्यक्त केले.

खालील तक्ता १० मध्ये जिल्हानिहाय उत्पादित अंडी विक्री कमी असल्या बाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | उत्पादित अंडी विक्री कमी असल्याची कारणे कोणती ? | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कुटुंबासाठी वापर | अंडी उत्पादन कमी आहे | मरतुक | बाजारदर कमी होता | एकूण |
| **अमरावती** | ८ | - | १ | - | **९** |
| **गडचिरोली** | १३ | - | - | - | **१३** |
| **चंद्रपूर** | ३९ | २३ | - | १ | **६३** |
| **ठाणे** | ३२ | ४ | - | - | **३६** |
| **नंदुरबार** | ३५ | २ | - | - | **३७** |
| **नाशिक** | २३ | - | २ | - | **२५** |
| **पालघर** | ७४ | - | - | १ | **७५** |
| **यवतमाळ** | १२ | २० | २ | - | **३४** |
| **एकूण** | **२३६** | **४९** | **५** | **२** | **२९२** |

**तक्ता १० : उत्पादित अंडी विक्री कमी असल्याची कारणे**

### ३.१.१४ पक्षांचे लसीकरणाची माहिती

पक्षांना लसीकरण करणे हे महत्त्वाचे आहे, त्यामुळे मरतुक कमी होण्यास मदत होते. लाभार्थीना प्रकल्पा अंतर्गत मिळालेल्या पक्षांचे वेळोवेळी लसीकरण करण्यात आले अथवा नाही असा प्रश्न केला असता; असे आढळून आले की, ६३० लाभार्थ्यांपैकी २६३ लाभार्थ्यांनी पक्षांना वेळोवेळी लसीकरण केले असल्याचे मत व्यक्त केले. तर ३६७ लाभार्थ्यांनी पक्षांना लसीकरण करण्यात आले नसल्याचे मत व्यक्त केले. खालील तक्ता ११ मध्ये पक्षांचे लसीकरणा बाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | प्रकल्पांतर्गत आपणास मिळालेल्या पक्ष्यांचे वेळोवेळी लसीकरण करण्यात आले काय ? | | |
|---|---|---|---|
| | वेळोवेळी लसीकरण करण्यात आले | वेळोवेळी लसीकरण करण्यात आले नाही | एकूण |
| अमरावती | ४२ | - | ४२ |
| गडचिरोली | २ | ८२ | ८४ |
| चंद्रपूर | १ | ८३ | ८४ |
| ठाणे | १३ | ७१ | ८४ |
| नंदुरबार | ७९ | ५ | ८४ |
| नाशिक | ३० | ५४ | ८४ |
| पालघर | ८० | ४ | ८४ |
| यवतमाळ | १६ | ६८ | ८४ |
| एकूण | **२६३** | **३६७** | **६३०** |

**तक्ता ११ : पक्षांचे लसीकरणा बाबतची माहिती**

### ३.१.१५ पक्षांना लसीकरण करणाऱ्या यंत्रणांचा तपशील

प्रकल्पा अंतर्गत प्राप्त पक्षांना वेळोवेळी लसीकरण केले आहे असे नमूद केलेल्या २६३ लाभार्थ्याना पक्षांना कोणामार्फत लसीकरण केले असे विचारले असता; १२३ लाभार्थ्यांनी पक्षांना जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयामार्फत लसीकरण केले असल्याचे मत व्यक्त केले. १२८ लाभार्थ्यांनी मदर युनिट मार्फत पक्षांना लसीकरण केले असल्याचे मत व्यक्त केले. तर १२ लाभार्थ्यांनी पक्षांना खाजगी दवाखाण्यातून / डॉक्टर मार्फत लसीकरण केले असल्याचे मत व्यक्त केले. खालील तक्ता १२ मध्ये लसीकरण कोणामार्फत केले याबाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | लसीकरण केले असल्यास कोणामार्फत केले ? | | | |
|---|---|---|---|---|
| | जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय | मदर युनिट | खाजगी | एकूण |
| अमरावती | - | ४१ | १ | ४२ |
| गडचिरोली | - | २ | - | २ |
| चंद्रपूर | - | १ | - | १ |
| ठाणे | ५ | ७ | १ | १३ |
| नंदुरबार | ७९ | - | - | ७९ |
| नाशिक | २६ | ४ | - | ३० |
| पालघर | ७ | ७२ | १ | ८० |
| यवतमाळ | ६ | १ | ९ | १६ |
| एकूण | **१२३** | **१२८** | **१२** | **२६३** |

**तक्ता १२ : पक्षांना लसीकरण करणाऱ्या यंत्रणांचा तपशील**

### ३.१.१६ पक्षांना लसीकरण न होण्याची कारणे

लाभार्थ्याना पक्षांना लसीकरण न होण्यामागील कारणांबाबत प्रश्न केला असता; ८९ लाभार्थ्यांनी निधी नसल्यामुळे लसीकरण केले नसल्याचे मत व्यक्त केले. तर ५०५ लाभार्थ्यांनी लसीकरणाची माहिती अथवा मार्गदर्शन केले नसल्याचे मत व्यक्त केले. २८ लाभार्थ्यांनी लसीकरणाचा खर्च परवडत नसल्याचे देखील मत व्यक्त केले; तर गावामध्ये पशु वैद्यकीय डॉक्टर येत नसल्याचे ८ लाभार्थ्यांचे मत आहे. खालील तक्ता १३ मध्ये लसीकरण न होण्याची कारणे दिलेली आहेत.

| जिल्हा | लसीकरण होत नसल्यास त्याची कारणे कोणती ? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | निधी उपलब्ध नाही | मार्गदर्शन नाही | खर्च परवडत नाही | डॉक्टर नाही | माहिती नाही | एकूण |
| **अमरावती** | २० | १ | - | - | २१ | ४२ |
| **गडचिरोली** | १ | ५ | - | - | ७८ | ८४ |
| **चंद्रपूर** | ४७ | २ | ८ | - | २७ | ८४ |
| **ठाणे** | २ | १ | २ | १ | ७८ | ८४ |
| **नंदुरबार** | ४ | २ | १ | | ७७ | ८४ |
| **नाशिक** | - | २ | - | - | ८२ | ८४ |
| **पालघर** | - | १५ | ३ | - | ६६ | ८४ |
| **यवतमाळ** | १५ | १६ | १४ | ७ | ३२ | ८४ |
| **एकूण** | **८९** | **४४** | **२८** | **८** | **४६१** | **६३०** |

**तक्ता १३ : पक्षांना लसीकरण न होण्याची कारणे**

### ३.१.१७ कुक्कुटपालनामुळे मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न

अंडी विक्री, पक्षी विक्रीमुळे लाभार्थीना झालेल्या वार्षिक उत्पन्ना बद्दल प्रश्न केला असता; असे आढळून आले की, अधिकतर लाभार्थ्यांनी, पक्षी बाजारात मांसाहारासाठी विकले आहेत; तसेच उत्पादित अंडी ही किरकोळ अथवा खुल्या बाजारात विकली आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांना मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये ३,०४९ इतके आहे.

जिल्हानिहाय विचार करता; नाशिक जिल्ह्यातील लाभार्थीना सर्वाधिक सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये ५५९५ इतके मिळाले. तर गडचिरोली जिल्ह्यात लाभार्थीना सर्वात कमी म्हणजेच सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये १०३३ इतके मिळाले. खालील तक्ता १४ मध्ये कुक्कुटपालनामुळे लाभार्थीना मिळालेल्या सरासरी वार्षिक उत्पन्नाबाबत माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | कुक्कुटपालनामुळे मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न (रुपये) |
|---|---|
| **अमरावती** | ४५५८ |
| **गडचिरोली** | १०३३ |
| **चंद्रपूर** | २०९१ |
| **ठाणे** | ४६१५ |
| **नंदुरबार** | २१७१ |
| **नाशिक** | ५५९५ |
| **पालघर** | २८३९ |
| **यवतमाळ** | १४९३ |
| **सरासरी प्रति युनिट** | **३०४९** |

**तक्ता १४ : कुक्कुटपालनामुळे लाभार्थीना मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न**

### ३.१.१८ लाभार्थ्यांना कुक्कुट पालनातून झालेला फायदा

कुक्कुट पालन व्यवसायामुळे लाभार्थींच्या कुटुंबास कोण कोणते फायदे झाले याबाबतची माहिती घेतली असता असे निदर्शनास येते की; २६७ लाभार्थ्यांनी कुक्कुट पालन व्यवसायातून चालना मिळाली, पोषण आहाराचा स्त्रोत उपलब्ध झाल्याचे मत व्यक्त केले. २२ लाभार्थ्यांनी कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्याचे तर १२८ लाभार्थ्यांनी कोणताच फायदा न झाल्याचे नमूद केले. खालील तक्ता १५ मध्ये जिल्हानिहाय लाभार्थ्यांना कुक्कुट पालनातून झालेल्या फायद्याबाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | कुक्कुट पालन व्यवसायामुळे आपल्या कुटुंबास कोणता फायदा झाला आहे ? | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कुक्कुट पालन व्यवसायास चालना मिळाली, पोषण आहाराचा स्त्रोत उपलब्ध झाला | कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली | पोषण आहाराचा स्त्रोत उपलब्ध झाला | कुक्कुट पालन व्यवसायास चालना मिळाली | पोषण आहाराचा स्त्रोत उपलब्ध झाला | कुक्कुट पालन व्यवसायास चालना मिळाली, निरंतर चरितार्थाचा स्त्रोत मिळाला | कोणताच फायदा झाला नाही | सांगता येत नाही | एकुण |
| अमरावती | ८ | १९ | ५ | ३ | - | - | ५ | २ | ४२ |
| गडचिरोली | २ | १ | ८ | - | १ | - | ५९ | १३ | ८४ |
| चंद्रपूर | ७३ | - | - | - | - | ३ | ४ | ४ | ८४ |
| ठाणे | ४ | - | - | - | १ | - | २ | ७७ | ८४ |
| नंदुरबार | २९ | - | ३४ | - | - | - | २१ | - | ८४ |
| नाशिक | ४२ | १ | २९ | - | - | - | - | १२ | ८४ |
| पालघर | ८० | - | - | - | - | - | - | ४ | ८४ |
| यवतमाळ | २९ | १ | १४ | १ | - | - | ३७ | २ | ८४ |
| एकुण | २६७ | २२ | ९० | ४ | २ | ३ | १२८ | ११४ | ६३० |

तक्ता १५ : लाभार्थ्यांना कुक्कुट पालनातून झालेला फायदा

### ३.१.१९ योजना प्रभावीपणे राबविण्यासाठीच्या उपाययोजना

लाभार्थींना स्वयम योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी अधिक कोणत्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे याबाबत प्रश्न केला असता; असे आढळून आले की; ४९% लाभार्थ्यांनी शक्यतो पक्षी वाटप करतांना देशी आणि अंड्यावरील तयार पक्षी दयावे; असे मत व्यक्त केले; जेणेकरून पक्ष्यांची मरतुक कमी होऊन लाभार्थ्यांना फायदा होईल. २४% लाभार्थ्यांना योजनेबद्दल आणि कुक्कुटपालना संबंधी वेळोवेळी तांत्रिक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळावे असे वाटते. तर १६% लाभार्थ्यांनी असे मत व्यक्त केले की, खाद्याचे अनुदान न देता आवश्यक प्रमाणात आणि वर्षभर सरकारी योजनेतून खाद्य देण्यात यावे. तसेच ११% लाभार्थ्यांनी शासकीय योजनेतून वेळोवेळी आवश्यक खाद्य आणि लसीकरण उपलब्ध व्हावे असे; मत व्यक्त केले. खालील आकृती ४ मध्ये स्वयम योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी उपाययोजना करण्यासाठीची लाभार्थ्यांची मते दर्शवण्यात आली आहेत.




आकृती ४ :योजना प्रभावीपणे राबविण्यासाठीच्या उपाययोजना - लाभार्थी मत

## ३.२ अंगणवाडीसाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष

स्वयम प्रकल्पा अंतर्गत निवडलेल्या गावांतील ३०३ अंगणवाडीसाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष पुढे तपशीलवार मांडण्यात आले आहेत. सदर प्रकल्पा अंतर्गत, अंगणवाड्यांना अंडी वाटप, अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा स्त्रोत, तसेच प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी उपाययोजना इत्यादी बाबत माहिती घेण्यात आली. अंगणवाडीसाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

### ३.२.१ जिल्हानिहाय अंगणवाडी निवड

स्वयम प्रकल्पाअंर्तगत ८ जिल्ह्यांमधील एकूण ३०३ अंगणवाड्यांची निवड करण्यात आली. त्यापैकी सर्वाधिक म्हणजेच ६९ (२२.७७%) अंगणवाड्या ह्या पालघर जिल्ह्यातील निवडण्यात आल्या. तर सर्वात कमी म्हणजेच २२ (७.२६%) अंगणवाड्या ह्या यवतमाळ जिल्ह्यातील निवडण्यात आल्या. खालील आकृती ५ मध्ये जिल्हानिहाय अंगणवाड्या निवडीची माहिती दर्शवण्यात आली आहे.




आकृती ५ : जिल्हानिहाय निवडलेल्या अंगणवाडी

### ३.२.२ स्वयम प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला अंड्यांच्या पुरवठाबाबत

स्वयम प्रकल्पा अंर्तगत ८ जिल्ह्यांमधील एकूण ३०३ अंगणवाड्यांची निवड करण्यात आली. त्यापैकी केवळ नाशिक जिल्ह्यातील ६ अंगणवाडीमध्ये (१.९८%) स्वयम प्रकल्पा अंर्तगत सन २०१७ ते २०२० दरम्यान अंड्याचा पुरवठा करण्यात आला. खालील तक्ता १६ मध्ये प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला केलेल्या अंड्यांच्या पुरवठ्याची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | स्वयम प्रकल्पांतर्गत आपल्या अंगणवाडीला अंड्यांचा पुरवठा केला जातो काय ? | | |
|---|---|---|---|
| | अंड्यांचा पुरवठा करण्यात आलेल्या अंगणवाड्यांची संख्या | अंड्यांचा पुरवठा न करण्यात आलेल्या अंगणवाड्यांची संख्या | एकुण |
| **अमरावती** | - | २३ | २३ |
| **गडचिरोली** | - | ३९ | ३९ |
| **चंद्रपूर** | - | २५ | २५ |
| **ठाणे** | - | ४५ | ४५ |
| **नंदुरबार** | - | ३९ | ३९ |
| **नाशिक** | ६ | ३५ | ४१ |
| **पालघर** | - | ६९ | ६९ |
| **यवतमाळ** | - | २२ | २२ |
| **एकुण** | **६** | **२९७** | **३०३** |

तक्ता १६ : जिल्हानिहाय प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला केलेल्या अंड्यांचा पुरवठा

### ३.२.३ प्रकल्पा अंतर्गत प्रति दिवशी अंगणवाडीला केलेल्या अंड्यांच्या पुरवठयाबाबत

स्वयम प्रकल्पा अंर्तगत सन २०१७ ते २०२० दरम्यान लाभार्थ्यांकडून अंगणवाड्यांना उत्पादित अंड्याचा पुरवठा करण्यात आला. सदर अंगणवाडीतील शिक्षकांना प्रकल्पाअंतर्गत प्रति दिवशी अंगणवाडीला लाभार्थ्यांकडून केलेल्या अंड्यांच्या पुरवठया बाबत माहिती विचारली असता असे निदर्शनास आले की; फक्त नाशिक जिल्ह्यातील अंगणवाड्यांना प्रति दिवशी २६७ अंड्याचा पुरवठा केला गेला असल्याचे नमूद करण्यात आले. खालील तक्ता १७ मध्ये प्रकल्पाअंतर्गत प्रति दिवशी अंगणवाडीला केलेल्या अंड्यांचा पुरवठ्याबाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | प्रति दिवशी किती अंड्यांचा पुरवठा केला जातो ? |
|---|---|
| | प्रति दिवशी पुरवठा केलेल्या अंड्यांची संख्या |
| **अमरावती** | - |
| **गडचिरोली** | - |
| **चंद्रपूर** | - |
| **ठाणे** | - |
| **नंदुरबार** | - |
| **नाशिक** | २६७ |
| **पालघर** | - |
| **यवतमाळ** | - |
| **एकुण** | **२६७** |

**तक्ता १७ : प्रकल्पा अंतर्गत प्रति दिवशी अंगणवाडीला केलेल्या अंड्यांचा पुरवठा**

### ३.२.४ प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला विहित वेळेत व पुरेशा अंड्यांच्या पुरवठयाबाबत

स्वयम प्रकल्पा अंर्तगत सन २०१७ ते २०२० दरम्यान अंगणवाड्यांना लाभार्थ्यांकडून उत्पादित अंड्याचा पुरेसा पुरवठा होतो का याबाबत माहिती घेतली असता असे निदर्शनास आले की; केवळ नाशिक जिल्ह्यातील ६ अंगणवाडीमध्ये (१.९८%) स्वयम प्रकल्पा अंर्तगत विहित वेळेत पुरेशी अंडी उपलब्ध होतात. खालील तक्ता १८ मध्ये प्रकल्पा अंर्तगत अंगणवाडीला विहित वेळेत पुरेशी अंडी उपलब्धते बाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | स्वयम प्रकल्पांतर्गत पुरवठा होत असल्यास विहित वेळेत पुरेशी अंडी उपलब्ध होतात काय? | | |
|---|---|---|---|
| | पुरेश्या अंड्यांचा पुरवठा होत असलेल्या अंगणवाड्यांची संख्या | अंड्यांचा पुरवठा न होणाऱ्या अंगणवाड्यांची संख्या | एकुण |
| **अमरावती** | - | २३ | २३ |
| **गडचिरोली** | - | ३९ | ३९ |
| **चंद्रपूर** | - | २५ | २५ |
| **ठाणे** | - | ४५ | ४५ |
| **नंदुरबार** | - | ३९ | ३९ |
| **नाशिक** | ६ | ३५ | ४१ |
| **पालघर** | - | ६९ | ६९ |
| **यवतमाळ** | - | २२ | २२ |
| **एकुण** | **६** | **२९७** | **३०३** |

**तक्ता १८ : प्रकल्पा अंतर्गत अंगणवाडीला विहित वेळेत व पुरेशा अंड्यांच्या पुरवठ्याबाबत**

### ३.२.५ अंड्यांची पर्यायी व्यवस्था

अंगणवाडी कर्मचारी / सेविका यांना स्वयम प्रकल्पांतर्गत विहित वेळेत पुरेशी अंडी उपलब्ध होत नसल्यास इतर पर्यायी व्यवस्थेबाबत विचारणा केली असता त्यांनी खालील पर्याय नमूद केले आहेत.

- अंगणवाडीमध्ये अमृत आहार योजना चालू आहे; त्याअंतर्गत अंडी किंवा इतर पर्यायी पोषण आहार दिला जातो.
- पर्यायी अंड्यांची खरेदी ही किरकोळ बाजारातून करण्यात येते.
- अंडी उपलब्ध न झाल्यात त्या दिवशी बालकांना अंड्यांचे वाटप न करता पर्यायी पोषण आहाराचे वाटप करण्यात येते.

## ३.३ मदर युनिटसाठीचे निष्कर्ष

मूल्यमापनासाठी एकूण १६ मदर युनिटकडून विहित प्रपत्रात माहिती संकलित केलेली आहे. मदर युनिटची सद्यस्थिती, मदर युनिट मधील सुविधा, युनिट चालकांचे प्रशिक्षण, पक्षी वाटप, पक्षांना खाद्य पुरवठा, लसीकरण इत्यादी बाबींवरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत

### ३.३.१ जिल्हानिहाय मदर युनिट निवड

स्वयम प्रकल्प मूल्यमापना अंर्तगत ८ जिल्ह्यांमधील एकूण १६ मदर युनिटची निवड करण्यात आली. सदर मुल्यमापन अभ्यासासाठी प्रत्येक जिल्ह्यांतील (अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, नंदुरबार, नाशिक, पालघर, ठाणे व यवतमाळ) २ मदर युनिटची निवड करण्यात आली आहे. खालील आकृती ६ मध्ये जिल्हानिहाय मदर युनिट निवडीची माहिती दर्शवण्यात आली आहे.




आकृती ६ : जिल्हानिहाय निवडलेले मदर युनिट

### ३.३.२ मदर युनिट सद्यस्थिती

स्वयम प्रकल्प मूल्यमापना अंर्तगत ८ जिल्ह्यांमधील एकूण १६ मदर युनिटची निवड करण्यात आली. त्यापैकी ८ जिल्ह्यातील १२ मदर युनिट सध्यस्थितीमध्ये चालू असल्याचे निर्दर्शनास आले; ४ जिल्ह्यातील ४ युनिट हे बंद असल्याचे निर्दर्शनास आले. चंद्रपूर, अमरावती, पालघर, यवतमाळ येथील भेट देण्यात आलेली मदर युनिट चालू नसल्याचे निर्दर्शनास आले आहे. खालील तक्ता १९ मध्ये जिल्हानिहाय प्रकल्पाअंतर्गत मदर युनिटच्या सध्यस्थितीची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | सद्यस्थितीत मदर युनिट चालू आहे का ? | | |
|---|---|---|---|
| | सद्यस्थितीत चालू मदर युनिट | सद्यस्थितीत बंद मदर युनिट | एकुण |
| **अमरावती** | १ | १ | २ |
| **गडचिरोली** | २ | - | २ |
| **चंद्रपूर** | १ | १ | २ |
| **ठाणे** | २ | - | २ |
| **नंदुरबार** | २ | - | २ |
| **नाशिक** | २ | - | २ |
| **पालघर** | १ | १ | २ |
| **यवतमाळ** | १ | १ | २ |
| **एकुण** | **१२** | **४** | **१६** |

तक्ता १९ : जिल्हानिहाय मदर युनिटची सद्यस्थिती

### ३.३.३ मदर युनिटमधील पक्षी निवारा/घरटी सद्यस्थिती

८ जिल्ह्यांमधील एकूण १६ मदर युनिटमधील पक्षी निवारा अथवा घरटी बाबत सध्यस्थितीचा आढावा घेतला असता असे; निदर्शनास आले की; १२ मदर युनिटमधील पक्षी निवारा / घरटी सध्यस्थितीत सुस्थितीत आहेत; तर ४ मदर युनिटमधील पक्षी निवारा / घरटी सुयोग्य स्थिती नसल्याचे निदर्शनास आले. खालील तक्ता २० मध्ये जिल्हानिहाय पक्षी निवारा / घरटी सध्यस्थितीची माहिती दर्शवण्यात आली आहेत.

| जिल्हा | मदर युनिट कडील पक्षांसाठी उभी केलेली निवारा/घरटी सुयोग्य स्थितीत आहेत का? | | |
|---|---|---|---|
| | पक्षी निवारा/ घरटी सुयोग्य स्थितीत असलेले मदर युनिट | पक्षी निवारा/ घरटी सुयोग्य स्थितीत नसलेले मदर युनिट | एकुण |
| अमरावती | १ | १ | २ |
| गडचिरोली | २ | - | २ |
| चंद्रपूर | १ | १ | २ |
| ठाणे | २ | - | २ |
| नंदुरबार | २ | - | २ |
| नाशिक | २ | - | २ |
| पालघर | १ | १ | २ |
| यवतमाळ | १ | १ | २ |
| एकुण | **१२** | **४** | **१६** |

**तक्ता २० : मदर युनिटमधील पक्षी निवारा / घरटी सद्यस्थिती**

### ३.३.४ मदर युनिटमध्ये उपलब्ध सुविधा

सुस्थितीत असलेल्या १२ मदर युनिटमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांबाबतची माहिती घेतली असता असे आढळले की; सर्व १२ मदर युनिटमध्ये पिण्याचे पाणी, खाद्य आणि स्वच्छता इत्यादी सुविधा असल्याचे आढळून आले. खालील तक्ता २१ मध्ये मदर युनिटमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांबाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | मदर युनिटमध्ये कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत ? | | |
|---|---|---|---|
| | पिण्याचे पाणी | खाद्य | स्वच्छता |
| अमरावती | १ | १ | १ |
| गडचिरोली | २ | २ | २ |
| चंद्रपूर | १ | १ | १ |
| ठाणे | २ | २ | २ |
| नंदुरबार | २ | २ | २ |
| नाशिक | २ | २ | २ |
| पालघर | १ | १ | १ |
| यवतमाळ | १ | १ | १ |
| एकुण | **१२** | **१२** | **१२** |

**तक्ता २१ : मदर युनिटमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा**

### ३.३.५ मदर युनिट मालकांच्या प्रशिक्षणा बाबतचा तपशील

स्वयम प्रकल्प मूल्यमापनाअंर्तगत ८ जिल्ह्यांमधील एकूण १६ मदर युनिट चालक/मालकांना कुकुट पालनासंबंधी प्रशिक्षण मिळाले आहे का याबाबत प्रश्न केला असता असे आढळले की; सर्व १६ मदर युनिट चालक/मालकांना एक आठवड्याचे प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे युनिट चालक/मालकांनी मत व्यक्त केले. तसेच हे प्रशिक्षण उमेद तर्फे आयोजित केले गेले. खालील तक्ता २२ मध्ये जिल्हानिहाय मदर युनिट चालक/मालकांना कुकुट पालनासंबंधी प्रशिक्षणाबाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | मदर युनिट स्थापन झाल्यानंतर आपणास कुकुट पालनासंबंधी प्रशिक्षण मिळाले आहे काय ? | |
|---|---|---|
| | प्रशिक्षण मिळालेले मदर युनिट चालक | प्रशिक्षण न मिळालेले मदर युनिट चालक |
| अमरावती | २ | - |
| गडचिरोली | २ | - |
| चंद्रपूर | २ | - |
| ठाणे | २ | - |
| नंदुरबार | २ | - |
| नाशिक | २ | - |
| पालघर | २ | - |
| यवतमाळ | २ | - |
| एकुण | १६ | - |

तक्ता २२ : मदर युनिट मालकांच्या प्रशिक्षणा बाबतचा तपशील

### ३.३.६ मदर युनिटकडून टप्पेनिहाय पक्षी वाटपाची संख्या

मदर युनिटकडून लाभार्थ्यांना टप्पेनिहाय किती पक्षी वाटप करण्यात आले याची माहिती घेतली असता, पहिल्या टप्प्यात १,३२,३२० पक्षी वाटप करण्यात आल्याचे दिसून आले. तर दुसऱ्या टप्प्यात ९४,९६५ पक्षी वाटप केल्याचे व तिसऱ्या टप्प्यात ६६,३१० पक्षी असे एकूण २,९३,५९५ पक्षी वाटप केले असल्याचे आढळून आले. खालील तक्ता २३ मध्ये जिल्हानिहाय मदर युनिटकडून टप्पेनिहाय पक्षी वाटप संख्या बाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | प्रकल्पांतर्गत टप्पेनिहाय किती पक्षांचे वाटप केले आहे ? | | | |
|---|---|---|---|---|
| | पहिला टप्पा | दुसरा टप्पा | तिसरा टप्पा | एकूण |
| अमरावती | १५५८० | ११४६० | ७९४० | ३४९८० |
| गडचिरोली | १६६८० | १२५१० | ८३४० | ३७५३० |
| चंद्रपूर | १६६६० | ८४४५ | ८३३० | ३३४३५ |
| ठाणे | १६६८० | १२५१० | ८३४० | ३७५३० |
| नंदुरबार | १६६८० | १२५१० | ८३४० | ३७५३० |
| नाशिक | १६६८० | १२५१० | ८३४० | ३७५३० |
| पालघर | १६६८० | १२५१० | ८३४० | ३७५३० |
| यवतमाळ | १६६८० | १२५१० | ८३४० | ३७५३० |
| एकूण | १,३२,३२० | ९४,९६५ | ६,६३१० | २९३५९५ |

तक्ता २३: मदर युनिटकडून टप्पेनिहाय पक्षी वाटप संख्या

### ३.३.७ मदर युनिट अंतर्गत सर्व लाभार्थ्यांना योजनेच्या तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरणाबाबत तपशील

मदर युनिट अंतर्गत सर्व लाभार्थ्यांना योजनेच्या तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरण केले गेले आहे का या बाबत युनिट चालकांना विचारले असता असे आढळले की; १३ मदर युनिट अंतर्गत सर्व लाभार्थ्यांना योजनेच्या तिन्ही टप्प्यात पक्षी वितरण केले गेले असल्याची माहिती मिळाली. तर ३ जिल्ह्यातील युनिट हे करोना काळात बंद झाले असल्याने तिथे सर्व लाभार्थ्यांना पक्षी वितरण करण्यावर मर्यादा आल्या. तेव्हा वितरण न केलेल्या पक्षांचे इतर लाभार्थ्यांना वितरण केले गेले असल्याचे युनिट चालकांनी मत व्यक्त केले. खालील तक्ता २४ मध्ये जिल्हानिहाय मदर युनिट अंतर्गत सर्व लाभार्थ्यांना योजनेच्या तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरणाची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | आपल्या मदर युनिट अंतर्गत सर्व लाभार्थ्यांना योजनेच्या तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरण केले आहे काय ? | | |
|---|---|---|---|
| | तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरण केलेले मदर युनिट संख्या | तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरण न केलेले मदर युनिट संख्या | एकुण |
| अमरावती | १ | १ | २ |
| गडचिरोली | १ | १ | २ |
| चंद्रपूर | २ | - | २ |
| ठाणे | २ | - | २ |
| नंदुरबार | २ | - | २ |
| नाशिक | २ | - | २ |
| पालघर | २ | - | २ |
| यवतमाळ | १ | १ | २ |
| एकुण | **१३** | **३** | **१६** |

तक्ता २४ : मदर युनिट अंतर्गत योजनेच्या तिन्ही टप्प्यात पक्ष्यांचे वितरणाची माहिती

### ३.३.८ जिल्हानिहाय मदर युनिट अंतर्गत पक्षांना दिलेल्या लसीकरणाची माहिती

पक्षांना लसीकरण करणे हे महत्त्वाचे आहे, त्यामुळे मरतुक कमी होण्यास मदत होते. मदर युनिट चालकांना प्रकल्पा अंतर्गत वेळोवेळी लसीकरण करण्यात आले अथवा नाही याबाबत प्रश्न केला असता; असे आढळून आले की, सर्व १६ (१००%) मदर युनिट चालकांनी पक्षांना वेळोवेळी लसीकरण केले असल्याचे मत व्यक्त केले. खालील तक्ता २५ मध्ये जिल्हानिहाय मदर युनिट अंतर्गत लसीकरणा बाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | प्रकल्पांतर्गत असलेल्या पक्ष्यांचे वेळोवेळी लसीकरण करण्यात येते काय ? | | |
|---|---|---|---|
| | पक्षांना वेळोवेळी लसीकरण करणाऱ्या मदर युनिटची संख्या | पक्षांना वेळोवेळी लसीकरण न केलेल्या मदर युनिटची संख्या | एकुण |
| अमरावती | २ | - | २ |
| गडचिरोली | २ | - | २ |
| चंद्रपूर | २ | - | २ |
| ठाणे | २ | - | २ |
| नंदुरबार | २ | - | २ |
| नाशिक | २ | - | २ |
| पालघर | २ | - | २ |
| यवतमाळ | २ | - | २ |
| एकूण | **१६** | - | **१६** |

तक्ता २५ : जिल्हानिहाय मदर युनिट अंतर्गत पक्षांना केलेल्या लसीकरणाची माहिती

### ३.३.९ मदर युनिट अंतर्गत लसीकरण करणारी यंत्रणा

प्रकल्पा अंतर्गत पक्षांना वेळोवेळी लसीकरण केलेल्या १६ मदर युनिट चालकांनी पक्षांना कोणामार्फत लसीकरण केले असे विचारले असता; ४ मदर युनिट चालकांनी पक्षांना जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयामार्फत लसीकरण केले असल्याचे मत व्यक्त केले. ५ मदर युनिट चालकांनी मदर युनिटमार्फत पक्षांना लसीकरण केले असल्याचे मत व्यक्त केले. तर ७ मदर युनिट चालकांनी पक्षांना खाजगी दवाखाण्यातून / डॉक्टर मार्फत लसीकरण केले असल्याचे मत व्यक्त केले. खालील तक्ता २६ मध्ये मदर युनिट अंतर्गत लसीकरण करणाऱ्या यंत्रणेबाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | लसीकरण होत असल्यास कोणामार्फत केले जाते ? | | | |
|---|---|---|---|---|
| | जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय | मदर युनिट | खाजगी | एकूण |
| **अमरावती** | - | १ | १ | २ |
| **गडचिरोली** | १ | १ | - | २ |
| **चंद्रपूर** | १ | - | १ | २ |
| **ठाणे** | - | १ | १ | २ |
| **नंदुरबार** | - | १ | १ | २ |
| **नाशिक** | - | - | २ | २ |
| **पालघर** | २ | - | - | २ |
| **यवतमाळ** | - | १ | १ | २ |
| **एकूण** | **४** | **५** | **७** | **१६** |

**तक्ता २६ : मदर युनिट अंतर्गत लसीकरण करणारी यंत्रणा**

### ३.३.१० मदर युनिटला खाद्य पुरवठ्यासाठी निधीबाबत तपशील

मदर युनिटला पक्षांना खाद्याचा पुरवठा करण्यास निधी प्राप्त होतो का आणि होत असल्यास निधी पुरेसा आहे का असे विचारले असता; ४ मदर युनिट चालकांनी पक्षांना खाद्याचा पुरेसा पुरवठा करण्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त होत असल्याचे मत व्यक्त केले; तर १२ मदर युनिट चालकांनी पक्षांना खाद्याचा पुरेसा पुरवठा करण्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्याचे मत व्यक्त केले. तर २ मदर युनिट चालकांनी पक्षांना खाद्याचा पुरेसा पुरवठा करण्यासाठी मिळणारा निधी हा पुरेसा असल्याचे मत व्यक्त केले. १४ मदर युनिट चालकांनी पक्षांना खाद्याचा पुरेसा पुरवठा करण्यासाठी मिळणारा निधी हा पुरेसा नाही असे मत व्यक्त केले. खालील तक्ता २७ मध्ये मदर युनिटला खाद्य पुरवठासाठी निधीबाबत माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | पक्ष्यांना खाद्याचा पुरेसा पुरवठा करण्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त होतो काय ? | | | |
|---|---|---|---|---|
| | निधी प्राप्त होतो | | पुरेसा निधी प्राप्त होतो. | |
| | निधी प्राप्त झालेल्या मदर युनिटची संख्या | निधी प्राप्त न झालेल्या मदर युनिटची संख्या | पुरेसा निधी प्राप्त झालेल्या मदर युनिटची संख्या | पुरेसा निधी प्राप्त न झालेल्या मदर युनिटची संख्या |
| **अमरावती** | - | २ | - | २ |
| **गडचिरोली** | १ | १ | - | २ |
| **चंद्रपूर** | - | २ | - | २ |
| **ठाणे** | १ | १ | १ | १ |
| **नंदुरबार** | - | २ | - | २ |
| **नाशिक** | १ | १ | - | २ |
| **पालघर** | - | २ | - | २ |
| **यवतमाळ** | १ | १ | १ | १ |
| **एकूण** | **४** | **१२** | **२** | **१४** |

**तक्ता २७ : मदर युनिटला पुरेसा खाद्य पुरवठासाठी निधीबाबत माहिती**

### ३.३.११ जिल्हानिहाय पुरेसा निधी नसल्यास येणाऱ्या अडचणी

१४ मदर युनिट चालकांनी पक्षांना खाद्याचा पुरेसा पुरवठा करण्यासाठी मिळणारा निधी हा पुरेसा नसल्याचे मत व्यक्त केले, तेव्हा त्यांना निधी जर पुरेसा नसेल तर तुम्हाला कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते असा प्रश्न केला असता; मदर युनिट चालकांनी पक्षांना लागणारे अधिकचे खाद्य हे बाजरातून स्वखर्चाने विकत आणावे लागते; त्यासाठी त्यांना अधिक रक्कम मोजावी लागते असे मत सर्व १४ मदर युनिट चालकांनी व्यक्त केले.

### ३.३.१२ मदर युनिट स्तरावरून लाभार्थ्यांना पुरविलेल्या पक्षांसाठी होणाऱ्या खाद्याचा पुरवठा

मदर युनिट मार्फत लाभार्थ्यांना पुरवठा केलेल्या पक्षांना खाद्याचा पुरवठा मदर युनिट स्तरावर केला जातो किंवा कसे याबाबत माहिती घेतली असता २ मदर युनिट मार्फत लाभार्थ्यांना पुरविलेल्या पक्षांसाठी खाद्याचा पुरवठा केल्याचे आढळून आले. तसेच ३ मदर युनिट चालकांनी खाजगी पुरवठादाराकडून लाभार्थ्यांना पुरविलेल्या पक्षांसाठी खाद्याचा पुरवठा केल्याचे नमूद केले. खालील तक्ता २८ मध्ये मदर युनिट स्तरावरून लाभार्थ्यांना पुरविलेल्या पक्षांसाठी होणाऱ्या खाद्याचा पुरवठ्याचा तपशील दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांना पुरविलेल्या पक्षांसाठी आपल्या स्तरावर खाद्याचा पुरवठा केला जातो काय? | | | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांना खाद्य पुरवठा करणाऱ्या मदर युनिटची संख्या | लाभार्थ्यांना खाद्य पुरवठा न करणाऱ्या मदर युनिटची संख्या | खाजगी पुरवठादार | एकूण |
| अमरावती | - | २ | - | २ |
| गडचिरोली | - | २ | - | २ |
| चंद्रपूर | - | २ | - | २ |
| ठाणे | २ | - | - | २ |
| नंदुरबार | - | - | २ | २ |
| नाशिक | - | २ | - | २ |
| पालघर | - | २ | - | २ |
| यवतमाळ | - | १ | १ | २ |
| एकूण | २ | ११ | ३ | १६ |

तक्ता २८ : मदर युनिट स्तरावरून लाभार्थ्यांना पुरविलेल्या पक्षांसाठी होणाऱ्या खाद्याचा पुरवठ्याचा तपशील

### ३.३.१३ पक्षांना रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मिळणारी मदत

मदर युनिट चालकांना पक्षांबाबत आपत्कालीन परिस्थितीमध्ये पक्षांना एखादा रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मदत मिळते काय असा प्रश्न केला असता; ३ मदर युनिट चालकांनी पक्षांना रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मदत मिळत असल्याचे मत व्यक्त केले. तसेच ही मदत औषध रूपाने केली जात असल्याचे चालकांनी नमूद केले. तर १३ मदर युनिट चालकांनी पक्षांना रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मदत मिळत नसल्याचे मत व्यक्त केले. खालील तक्ता २९ मध्ये मदर युनिट चालकांना पक्षांना रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मिळणाऱ्या मदती बाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | पक्षांबाबत आपत्कालीन परिस्थितीमध्ये पक्षांना रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मदत मिळते काय? | | |
|---|---|---|---|
| | होय | नाही | एकूण |
| अमरावती | १ | १ | २ |
| गडचिरोली | - | २ | २ |
| चंद्रपूर | - | २ | २ |
| ठाणे | १ | १ | २ |
| नंदुरबार | - | २ | २ |
| नाशिक | १ | १ | २ |
| पालघर | - | २ | २ |
| यवतमाळ | - | २ | २ |
| एकूण | ३ | १३ | १६ |

तक्ता २९ : पक्षांना रोगाचा प्रादुर्भाव निर्माण झाल्यास शासनाकडून मिळणारी मदत

### ३.३.१४ मदर युनिट चालकांनी लाभार्थ्यांची अभिलेखे जमा केल्याचा तपशील

मदर युनिट चालकांनी लाभार्थ्यांच्या बाबतीतील (वितरण, उत्पन्न, खर्च, फलश्रुती अहवाल) अभिलेखे जमा केल्याचा तपशीला बाबत प्रश्न केला असता; १४ मदर युनिट चालकांनी आपल्या जवळील अभिलेखे हे नजिकच्या पशुवैद्यकीय संस्थेकडे आणि १ मदर युनिट चालकांने आपल्या जवळील अभिलेखे हे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे सादर अथवा जमा केले असल्याचे मत व्यक्त केले. तर १ मदर युनिट चालकांने आपल्या जवळील अभिलेखे हे जमा केले नसल्याची माहिती दिली. खालील तक्ता ३० मध्ये मदर युनिटचालकांनी लाभार्थ्यांची अभिलेखे जमा केल्याच्या तपशीला बाबतची जिल्हानिहाय माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | प्रकल्पांतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीतील अभिलेखे कोणाकडे जमा केलेली आहेत ? | | | |
|---|---|---|---|---|
| | नजिकची पशुवैद्यकीय संस्था | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | जमा केलेले नाही | एकूण |
| अमरावती | २ | - | - | २ |
| गडचिरोली | २ | - | - | २ |
| चंद्रपूर | २ | - | - | २ |
| ठाणे | १ | १ | - | २ |
| नंदुरबार | २ | - | - | २ |
| नाशिक | १ | - | १ | २ |
| पालघर | २ | - | - | २ |
| यवतमाळ | २ | - | - | २ |
| एकूण | १४ | १ | १ | १६ |

तक्ता ३० : जिल्हानिहाय मदर युनिट चालकांनी लाभार्थ्यांची अभिलेखे जमा केल्याचा तपशील

### ३.३.१५ मदर युनिटमुळे चालकांस व आदिवासी घटकास झालेल्या फायद्यांचा तपशील

मदर युनिट चालकांना मदर युनिटमुळे चालकांस व आदिवासी घटकास झालेल्या फायद्यांविषयी विचारले असता, १२ मदर युनिट चालकांनी व्यक्त केले की प्रकल्पामुळे कुक्कुट पालन व्यवसायास चालना मिळाली, पोषण आहाराचा स्त्रोत उपलब्ध झाला, स्वयं रोजगाराचे साधन प्राप्त झाले तर प्रत्येकी १ मदर युनिट चालकांनी व्यक्त केले की अंगणवाड्यांना पौष्टिक आहार उपलब्ध झाला, कुटुंबाच्या बचतीमध्ये वाढ झाली, स्वयं रोजगाराचे साधन प्राप्त झाले असल्याचे मत व्यक्त केले. तक्ता ३१ मध्ये मदर युनिटमुळे चालकांस व आदिवासी घटकास झालेल्या फायद्यांचा जिल्हानिहाय तपशील दर्शवण्यात आला आहे.

| जिल्हा | अंगणवाड्यांना पौष्टिक आहार उपलब्ध झाला | कुटुंबाच्या बचतीमध्ये वाढ झाली | स्वयं रोजगाराचे साधन प्राप्त झाले | स्वयं रोजगाराचे साधन प्राप्त झाले,पोषण आहाराचा स्त्रोत उपलब्ध झाला | कुक्कुटपालन व्यवसायास चालना मिळाली, पोषण आहाराचा स्त्रोत उपलब्ध झाला, स्वयं रोजगाराचे साधन प्राप्त झाले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| अमरावती | १ | १ | - | - | - | २ |
| गडचिरोली | - | - | - | - | २ | २ |
| चंद्रपूर | - | - | - | - | २ | २ |
| ठाणे | - | - | - | - | २ | २ |
| नंदुरबार | - | - | १ | - | १ | २ |
| नाशिक | - | - | - | - | २ | २ |
| पालघर | - | - | - | - | २ | २ |
| यवतमाळ | - | - | - | १ | १ | २ |
| एकूण | १ | १ | १ | १ | १२ | १६ |

तक्ता ३१ : जिल्हानिहाय मदर युनिटमुळे चालकांस व आदिवासी घटकास झालेल्या फायद्यांचा तपशील

## ३.४ एकात्मिक बाल विकास प्रकल्पासाठीचे प्रपत्रातील निष्कर्ष

स्वयम प्रकल्पाअंर्तगत शासनाच्या महिला व बाल विकास विभागाकडून एकात्मिक बाल विकास प्रकल्पासाठीचे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. सदर प्रकल्पामुळे, अंगणवाड्यांना होणारा अंड्याचा पुरवठा, बालकांना झालेला फायदा तसेच प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी उपाययोजना याबाबत माहिती घेण्यात आली. स्वयम प्रकल्पा अंतर्गत एकात्मिक बाल विकास प्रकल्प प्रपत्रातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

### ३.४.१ जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांची निवड

स्वयम प्रकल्प मूल्यमापना अंर्तगत ८ जिल्ह्यांमधील एकूण १५ एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांची निवड करण्यात आली. त्यापैकी अमरावती जिल्हा सोडून इतर उर्वरित जिल्ह्यात प्रत्येकी २ म्हणजेच (१३.३३%) एकात्मिक बाल विकास केंद्र निवडण्यात आले. खालील आकृती ७ मध्ये जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास केंद्र निवडीची माहिती दर्शवण्यात आली आहे.




**आकृती ७ : जिल्हानिहाय निवडलेले एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय**

### ३.४.२ एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांची संख्या

एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून त्यांच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या एकूण अंगणवाड्यांच्या संख्येची माहिती घेतली असता असे निदर्शनास येते की; मूल्यमापनात भेट दिलेल्या १५ एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत एकूण ११,३६४ आंगणवाड्या येतात. सर्वाधिक अंगणवाड्या २,३६० (२०.७७%) ह्या पालघर जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येतात. तर सर्वात कमी ४३३ (३.८१%) अंगणवाड्या ह्या अमरावती जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येतात. खालील तक्ता ३२ मध्ये जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | अंगणवाडी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| **अमरावती** | ४३३ | ३.८१ |
| **गडचिरोली** | १८६० | १६.३७ |
| **चंद्रपूर** | ८०३ | ७.०७ |
| **ठाणे** | ८८६ | ७.८० |
| **नंदुरबार** | २१०७ | १८.५४ |
| **नाशिक** | २२९१ | २०.१६ |
| **पालघर** | २३६० | २०.७७ |
| **यवतमाळ** | ६२३ | ५.४८ |
| **एकुण** | **११३६४** | **१००** |

**तक्ता ३२ : जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांची संख्या**

### ३.४.३ जिल्हानिहाय प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडीला केलेल्या अंड्यांचा पुरवठा

एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून त्यांच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांना केलेल्या अंड्यांच्या पुरवठ्या बाबतची माहिती घेतली असता असे निदर्शनास येते की; मूल्यमापनात भेट दिलेल्या १५ एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांमार्फत एकाही अंगणवाडीस स्वयम प्रकल्पा अंतर्गत अंड्यांचा पुरवठा केला गेला नाही. तसेच स्वयम प्रकल्पा अंतर्गत अंड्यांचा पुरवठा केला गेला नसल्याची कारणे विचारली असता, त्यांनी असे नमूद केले की; अंगणवाड्यांसाठी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अमृत आहार टप्पा १ व २ योजनेअंतर्गत स्थानिक स्तरावर गठित अमृत आहार समिती मार्फत अंडी खरेदी केली जाते; तसेच त्यांना स्वयम प्रकल्पाअंतर्गत अंड्यांचा पुरवठा करण्याबाबत माहिती नसल्याचे मत व्यक्त केले. खालील तक्ता ३३ मध्ये जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत अंगणवाडीला केलेल्या अंड्यांच्या पुरवठ्याची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | कार्यालयांतर्गत असलेल्या एकाही अंगणवाडीला अंड्यांचा पुरवठा न केल्याचे नमूद केलेल्या बाल विकास प्रकल्प कार्यालयांची संख्या | एकुण |
|---|---|---|
| **अमरावती** | १ | १ |
| **गडचिरोली** | २ | २ |
| **चंद्रपूर** | २ | २ |
| **ठाणे** | २ | २ |
| **नंदुरबार** | २ | २ |
| **नाशिक** | २ | २ |
| **पालघर** | २ | २ |
| **यवतमाळ** | २ | २ |
| **एकुण** | **१५** | **१५** |

**तक्ता ३३ : जिल्हानिहाय एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांना केलेल्या अंड्यांचा पुरवठा**

## ३.५ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) जिल्हा स्तरावरील प्रपत्रातील निष्कर्ष

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयामार्फत स्वयम प्रकल्पा अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांची क्षमता बांधणी व कौशल्य विकास करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन करण्याचे महत्त्व पूर्ण काम करण्यात येते. स्वयम प्रकल्पा अंतर्गत लाभार्थी, मदर युनिट चालक, पशुसखी / पशुमित्र यांना दिलेल्या प्रशिक्षणामुळे लाभार्थी, मदर युनिट चालक यांना उपलब्ध झालेले उपजीविकेचे साधन, उत्पन्नात झालेली वाढ, पोषण आहाराचा स्त्रोत, तसेच प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी उपाययोजना याबाबत माहिती घेण्यात आली. स्वयम प्रकल्पात क्षमता बांधणी व कौशल्य विकास केलेल्या उमेद कार्यालयासाठीच्या प्रपत्रातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

### ३.५.१ जिल्हानिहाय महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयांची निवड

स्वयम प्रकल्प मूल्यमापना अंतर्गत ८ जिल्ह्यांमधील एकूण ८ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयांची निवड करण्यात आली. अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार आणि यवतमाळ या जिल्ह्यात प्रत्येकी १ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयाची निवड करण्यात आली.

### ३.५.२ जिल्हानिहाय शासनाने निर्धारित केलेले उद्दिष्टे/हेतू साध्य

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांना स्वयम प्रकल्पा अंतर्गत शासनाने निर्धारित केलेले उद्दिष्टे/हेतू साध्य झाली आहे का असे विचारले असता; ५ जिल्ह्यातील म्हणजेच अमरावती, चंद्रपूर, ठाणे, पालघर आणि नाशिक, या जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयाची शासनाने निर्धारित केलेले उद्दिष्टे/हेतू साध्य झाली असल्याचे अधिकाऱ्यांनी मत व्यक्त केले. तर गडचिरोली, नंदुरबार आणि यवतमाळ या जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयाची शासनाने निर्धारित केलेले उद्दिष्टे/हेतू ही करोना काळातील निर्बंधांमुळे साध्य करता आली नसल्याचे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. खालील तक्ता ३४ मध्ये जिल्हानिहाय महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयाने शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टे/हेतू साध्य बाबतची माहिती दर्शवण्यात आली आहे.

| जिल्हा | स्वयम प्रकल्पाअंतर्गत शासनाने निर्धारित केलेले उद्दिष्टे/हेतू साध्य झाली आहेत का? | | |
|---|---|---|---|
| | शासनाने निर्धारित केलेले उद्दिष्टे/हेतू साध्य केलेली कार्यालये | शासनाने निर्धारित केलेले उद्दिष्टे/हेतू साध्य न केलेली कार्यालये | एकुण |
| **अमरावती** | १ | - | १ |
| **गडचिरोली** | - | १ | १ |
| **चंद्रपूर** | १ | - | १ |
| **ठाणे** | १ | - | १ |
| **नंदुरबार** | - | १ | १ |
| **नाशिक** | १ | - | १ |
| **पालघर** | १ | - | १ |
| **यवतमाळ** | - | १ | १ |
| **एकुण** | **५** | **३** | **८** |

**तक्ता ३४ : जिल्हानिहाय उमेद कार्यालयाने शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टे/हेतू साध्य तपशील**

### ३.५.३ मदर युनिट धारकांच्या सन २०१७-१८ ते २०२१-२२ कालावधीत झालेल्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील

स्वयम प्रकल्पा अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांना मदर युनिट चालक/मालकांना क्षमता बांधणी व कौशल्य विकास करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन करण्याबाबतचे उद्दिष्ट व साध्य बाबत प्रश्न केला असता; असे माहिती मिळाली की; अमरावती, गडचिरोली आणि पालघर येथे उमेद कार्यालयामार्फत मदर युनिट चालक/मालकांचे प्रशिक्षण १००% पूर्ण झाले आहे. तर चंदपूर आणि नंदुरबार येथे अनुक्रमे ६३.६४% आणि ५८.३३% मदर युनिट चालक/मालकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. स्वयम प्रकल्पाच्या मदर युनिट धारकांच्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील खालील तक्ता ३५ मध्ये दर्शवण्यात आला आहे.

| जिल्हा | एकुण निर्धारित उद्दिष्ट | एकुण साध्य उद्दिष्ट | टक्केवारी |
|---|---|---|---|
| **अमरावती** | २ | २ | **१००.००** |
| **गडचिरोली** | १२ | १२ | **१००.००** |
| **चंद्रपूर** | ११ | ७ | **६३.६४** |
| **ठाणे** | ० | ० | **उपलब्ध नाही** |
| **नंदुरबार** | १२ | ७ | **५८.३३** |
| **नाशिक** | ० | ० | **उपलब्ध नाही** |
| **पालघर** | १० | १० | **१००.००** |
| **यवतमाळ** | ० | ० | **उपलब्ध नाही** |
| **एकुण** | **४७** | **३८** | **८०.८५** |

**तक्ता ३५ : मदर युनिट धारकांच्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील**

### ३.५.४ लाभार्थींच्या सन २०१७-१८ ते २०२१-२२ कालावधीत झालेल्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील

स्वयम प्रकल्पाअंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांना लाभार्थ्यांच्या क्षमता बांधणी व कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन करण्याबाबतचे उद्दिष्ट व साध्य विचारले असता; असे माहिती मिळाली की; एकूण २९,६५८ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे नियोजित होते; त्यापैकी २७,१९१ (९१.६८%) लाभार्थ्यांना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कार्यालयांमार्फत प्रशिक्षण दिले गेले. ठाणे जिल्ह्यामध्ये उमेद कार्यालयामार्फत १००% लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असल्याची माहिती मिळाली. तर अमरावती जिल्ह्यात सर्वात कमी ६०.३१% लाभार्थी प्रशिक्षणाचे उदिष्ट पूर्ण झाले आहे. खालील तक्ता ३६ मध्ये स्वयम प्रकल्पाच्या लाभार्थींच्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील दर्शवण्यात आला आहे.

| जिल्हा | एकुण निर्धारित उद्दिष्ट | एकुण साध्य उद्दिष्ट | टक्केवारी |
|---|---|---|---|
| **अमरावती** | ८३४ | ५०३ | ६०.३१ |
| **गडचिरोली** | ५००४ | ४१७० | ८३.३३ |
| **चंद्रपूर** | ३७५३ | २९१९ | ७७.७८ |
| **ठाणे** | २५०२ | २५०२ | १००.०० |
| **नंदुरबार** | २१३६ | २०९३ | ९७.९९ |
| **नाशिक** | ५८३८ | ५६३४ | ९६.५१ |
| **पालघर** | ५००४ | ४९६० | ९९.१२ |
| **यवतमाळ** | ४५८७ | ४४१० | ९६.१४ |
| **एकुण** | **२९६५८** | **२७१९१** | **९१.६८** |

**तक्ता ३६ : लाभार्थींच्या प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशील**

# प्रकरण क्र. ४
# निष्कर्ष, निरीक्षणे आणि शिफारशी



# प्रकरण क्र. ४. निष्कर्ष, निरीक्षणे आणि शिफारशी

## लाभार्थी स्तरावरील निष्कर्ष आणि शिफारशी

- ठाणे, नाशिक, पालघर या जिल्ह्यांमध्ये लाभार्थ्यांकडे उपलब्ध असलेल्या सरासरी पक्षांच्या संख्येवरून सदर तीन जिल्ह्यांत प्रकल्पाची स्थिती समाधानकारक दिसते.

- स्वयम प्रकल्पामुळे प्रकल्प क्षेत्रामधील आदिवासींमध्ये कुक्कुट पालनास चालना मिळाली असल्याचे आढळून आले.

- ४०% लाभार्थींनी सदर प्रकल्पाअंतर्गत कोणतेही उत्पन्न घेतले नसल्याचे नमुद केल्याचे आढळते यावरून सदर प्रकल्पाबाबत लाभार्थ्यांमध्ये पुरेशी जाणीव जागृती तसेच त्यातुन उत्पन्न मिळण्याकडे कल नसल्याचे दिसून येते, याकरीता पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे या विभागाने लाभार्थी प्रशिक्षण व जाणीव जागृती हे उपक्रम राबविणे आवश्यक वाटते.

- स्वयम प्रकल्पाच्या लाभार्थ्यांकडून पक्षांसाठी उभी केलेली निवारा/घरटी ही जीर्ण झालेली दिसून आले, तसेच बहुतांशी निवारा/घरटी यांना दरवाजा अथवा संरक्षक जाळी नसल्याचे आढळून आले. पक्ष्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी निवारा/घरटी यांना दरवाजा अथवा संरक्षक जाळी बसवून घेणे आवश्यक आहे; जेणेकरून जनावरांपासून पक्षांचा बचाव होईल. त्यासाठी लाभार्थी आणि मदर युनिट चालकांना शासनाकडून काही अनुदान अथवा कर्ज मिळाल्यास त्याचा फायदा होईल.

- लाभार्थ्यांना कुक्कुट पालनातून व्यवसाय कसा करायचा आणि उपलब्ध अंडी कुठे विकावी अथवा अधिकची अंडी विकण्यास बाजार ज्ञान नसल्यामुळे अपेक्षेप्रमाणे स्वयं रोजगाराचे साधन व निरंतर चरितार्थाचा स्त्रोत उपलब्ध झाला अथवा लाभार्थी कुटुंबांच्या आर्थिक उत्पन्न वाढीस मदत झाली आहे असे म्हणता येणार नाही.

- सदर प्रकल्पाअंतर्गत उत्पादित होणारी अंडी ही अंगणवाड्यांना पुरविली जात नसल्याचे निष्पन्न झाले आहे. लाभार्थी कुटूंबांना अंगणवाडीस अंड्यांचा पुरवठा करणेबाबत माहीती नसणे किंवा पुरवठा करण्यास उत्सुक नसणे ही त्या मागील कारणे दिसून येतात. प्राप्त परिस्थीतीत लाभार्थ्यांचा कल हा बाजारात अंडी विक्री करणे, पक्षी विक्री करणे याकडे असून त्यातून उत्पन्न मिळविणे लाभार्थींना शक्य झालेले आहे. सबब सदर प्रकल्पा अंतर्गत अंगणवाड्यांना अंडी पुरवठा करणे ही बाब व्यवहार्य अथवा उद्दिष्ट पुर्ती करणारी आहे असे दिसून येत नाही.

- कुक्कुट खाद्य, औषधे व लसीकरण इत्यादी विषयी लाभार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन अथवा प्रशिक्षण दिल्यास पक्षी मरतुकीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

## अंगणवाडी स्तरावरील निष्कर्ष आणि शिफारशी

- सदर प्रकल्पाव्दारे अंगणवाड्यांना अंडयांचा पुरवठा होत नसल्याचे आढळून आले. तसेच प्रकल्पाबाबत अंगणवाडी शिक्षक अथवा कर्मचारी यांना काहीच माहिती नसल्याने आढळून आले. त्यामुळे अंड्यांच्या पुरवठ्यामुळे आंगणवाडीमधील मुलांच्या आहारातील पोषण मुल्यात वाढ झाली असे म्हणता येणार नाही.

- गावातील लाभार्थी आणि अंगणवाडी शिक्षक अथवा कर्मचारी यांची एकत्रित बैठक / प्रशिक्षण घेऊन अंगणवाडीस प्रति दिन अंडी मागणी किती आणि आवश्यक अंडी पुरवठा कसा होईल आणि लाभार्थींना याबाबत वेळोवेळी मोबदला कसा मिळेल यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

### मदर युनिट स्तरावरील निष्कर्ष आणि शिफारशी

- प्रकल्पामुळे कुक्कुट पालन व्यवसायास चालना मिळाली, पोषण आहाराचा स्त्रोत उपलब्ध झाला, मदर युनिट धारकांना स्वयं रोजगाराचे साधन प्राप्त झाले.

- कुक्कुट खाद्य, औषधे व लसीकरण इत्यादी विषयी मदर युनिट चालकांना वेळोवेळी मार्गदर्शन अथवा प्रशिक्षण दिल्यास पक्षी मरतुकीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

### इतर निष्कर्ष आणि शिफारशी

- कुक्कुट पालन विषयक कौशल्य विकास क्षमता बांधणी या विषयीचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) कडे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यामुळे या कार्यासाठी उमेदच्या वतीने प्रशिक्षक म्हणून पशुसंवर्धन विभागाच्या पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पशुसंवर्धन विभागातील कुक्कुटपालन शास्त्रात पदव्युत्तर पदवी / डॉक्टरेट अर्हताधारक अधिकाऱ्यांच्या सहभागातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. उमेदच्या वतीने, प्रशिक्षण कार्यक्रमास अधिक चालना दिल्यास स्वयम प्रकल्पाच्या अंमलबजावणी कार्यक्रमास चालना मिळण्यास मदत होईल. म्हणून पुढील प्रमाणे शिफारशी करण्यात येत आहे.

- स्वयम् प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण कार्य, पशुसंवर्धन विभागांतर्गत कुक्कुट पालन शास्त्र विषयातील तज्ञांमार्फत पूर्ण करण्यात यावे; जेणेकरून लाभार्थी आणि मदर युनिट चालकांना कुक्कुट पालनाविषयी सखोल ज्ञान प्राप्त होईल, त्यामुळे मरतुकीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

- स्वयंम प्रकल्पा अंतर्गत लाभार्थींना निरंतर चरितार्थाचा स्त्रोत तसेच स्वयं रोजगाराचे साधन निर्माण होणेच्या दृष्टीने पक्षी वाटपाच्या विविध टप्प्यांवर त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देणे, वाटप केलेल्या पक्षांचे वेळोवेळी लसीकरण करणे व कुक्कुट पालन व्यवसायासंबंधी मार्गदर्शन करणे, तसेच त्यांच्या मध्ये व्यवसायिक दृष्टीकोण निर्माण करणे आवश्यक आहे.
- आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि ग्रामविकास विभाग या अंमलबजावणी यंत्रणांच्या क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांमध्ये सदर योजनेबाबत समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते. अंगणवाड्यांना सदर योजनेची माहिती नसणे, अंगणवाडी व सदर योजनेचे लाभार्थी यांचा कोणत्याही स्तरावर एकमेकांशी ताळमेळ नसणे यावरून समन्वयाचा अभाव स्पष्ट होतो. सबब सदर योजना भविष्यात प्रभावीपणे राबवायची झाल्यास आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, पशुसंवर्धन विभाग व ग्रामविकास विभाग यांच्या सर्व क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांना योजनेबाबत योग्य माहिती पुरविणे व त्यांच्यात योजना राबविण्याकरिता आंतरशाखीय समन्वय घडवून आणून योजनेचे लाभार्थी आणि आंगणवाड्या यांचा ताळमेळ (विक्रीदार व खरेदीदार या भूमिकेतून) घालून देणे महत्वाचे आहे, जे सद्यस्थितीत घडतांना दिसून येत नाही.

# शासन निर्णय

**ग्रामीण परसातील कुक्कुट पालन आणि अनुसूचित क्षेत्र / आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील अंगणवाडयातील मुलांच्या आहारामध्ये अंडयांचा पुरवठा करणे व स्वंयरोजगार निर्मिती करण्याकरिता सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीत "स्वयम् प्रकल्प" राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र. कुक्कुट-२०१७/प्र.क्र. २७१/पदुम-४,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ एप्रिल, २०१७.

**प्रस्तावना-**

राज्यातील अनुसूचित क्षेत्रामधील कुटुंबांची संतुलित आहाराची गरज लक्षात घेऊन, त्या भागात परसातील कुक्कुट पालन व पशुसंवर्धन विषयक इतर योजना राबविणे तसेच, स्वयंरोजगार निर्मिती करणे आणि त्या कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वसमावेपक एकात्मिक योजना राबविण्याची बाब व राज्यातील आदिवासी कुटुंबांना ग्रामीण परसातील कुक्कुट पालनाव्दारे रोजगार उपलब्ध होऊन अंगणवाडयांमधून पूरक आहाराव्दारे अंडी पुरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

अनुसूचित क्षेत्रातील कुपोपण कमी करण्याच्या दृष्टिकोनातून अंगणवाडयातील मुलांच्या आहारात अंडयांचा पुरवठा करणे व रोजगार निर्मिती करणे हा या **"स्वयम् प्रकल्प"** चा मुख्य उद्देश आहे. या करीता आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि ग्राम विकास विभाग (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)/जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांनी संयुक्तरित्या सदरचा प्रकल्प राबविणेस्तव दिनांक १८.४.२०१७ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुपंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

ग्रामीण परसातील कुक्कुट पालन आणि अनुसूचित क्षेत्र / आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील अंगणवाडयातील मुलांच्या आहारामध्ये अंडयांचा पुरवठा करणे व स्वयंरोजगार निर्मिती करण्याकरिता, सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षांच्या कालावधीत "स्वयम् प्रकल्प" राबविण्यास याद्वारे, शासनाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांकः कुक्कुट-२०१७/प्र.क्र. २७१/पदुम-४

**"स्वयम् प्रकल्प" राबविण्याचे कार्यक्षेत्र :-**

सदरचा **स्वयम्** प्रकल्प हा घोषीत करण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रांमधील खालील १६ आदिवासी जिल्हयांमध्ये राबविण्यात यावा.

| अ. क्र. | विभाग | आदिवासी जिल्ह्यांची संख्या | जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ३ | ठाणे, पालघर व रायगड |
| २ | पुणे | १ | पुणे |
| ३ | नाशिक | ५ | नाशिक, अहमदनगर, नंदूरबार, जळगाव व धुळे |
| ४ | अमरावती | २ | अमरावती व यवतमाळ |
| ५ | नागपूर | ४ | नागपूर, गडचिरोली, गोंदीया व चंद्रपूर |
| ६ | लातूर | १ | नांदेड |
| | **एकूण** | **१६** | |

**स्वयम प्रकल्पाचे स्वरुप:-**

अनुसूचित क्षेत्र / आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील १६ जिल्हयांमधील एकूण १०४ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रात, प्रत्येकी एक युनिट या प्रमाणे १०४ मदर युनिटची (खाजगी पक्षी संगोपन केंद्र) स्थापना करण्यात यावी. अंगणवाडयांतील मुलांची संख्या विचारात घेऊन, प्रत्येक मदर युनिट यांना सुमारे ४१७ लाभधारकांना संलग्न करण्यात यावे. अशा प्रकारे प्रकल्पांतर्गत एकूण ४३,३६८ कुटुंबांना लाभ देण्यात येईल.

या प्रकल्पांतर्गत मदर युनिटची स्थापना करुन मदर युनिटव्दारे एकदिवशीय देशी सुधारीत जातीचे पिल्ले (Low Input Technology Birds) शासकीय / खाजगी कुक्कुट प्रक्षेत्र येथून प्राप्त करुन घेऊन त्यांचे संगोपन ४ आठवडे वयापर्यंत करावयाचे आहे. मदर युनिट धारकांकडून लाभार्थीना पक्षी पुरवठा केल्यानंतर पहिल्या टप्प्यात प्रती पक्षी रु. ५५/-, दुस-या टप्प्यात रु. ५८/- व तिस-या टप्प्यात रु. ६०/- या प्रमाणे रक्कम मदर युनिट धारकास देय राहील. शासनाकडील पूर्वीचे १६ सघन कुक्कुट विकास गट, नव्याने स्थापित होणारे खाजगी-भागिदारी तत्वावरील सघन कुक्कुट विकास गट आणि कृषी विज्ञान केंद्रे हे देखील मदर युनिट म्हणून या योजनेमध्ये कार्य करू शकतील.

प्रकल्पांतर्गत निवडलेल्या प्रत्येक कुक्कुटपालक लाभार्थ्यांस पक्षांचा निवारा उभारणीस्तव रु. १,५००/- अनुदान देय असून, सदरचे अनुदान प्रत्यक्ष पक्षांचा निवारा उभारणीनंतर अदा करण्यात यावे. तसेच, प्रत्येक लाभार्थ्यांस ४ आठवडे वयाचे ४५ पक्षी १०० टक्के अनुदानावर मदर युनिट धारकामार्फत तीन टप्प्यात पहिल्या टप्प्यात २० पक्षी, १६ आठवडयानंतर दुस-या टप्प्यात १५ पक्षी व ३२ आठवडयानंतर तिस-या टप्प्यात १० पक्षी वाटप करण्यात यावे.

पृष्ठ **९** पैकी **२**

शासन निर्णय क्रमांकः कुक्कुट-२०१७/प्र.क्र. २७१/पदुम-४

**प्रकल्पांतर्गत विविध घटक व आर्थिक निकष:-**

या प्रकल्पांतर्गत विविध घटक, प्रमाणक व अंदाजीत किमंत खालील प्रमाणे राहील.

| अ क्र | तपशील | प्रमाणक / किंमत | एकूण |
|---|---|---|---|
| १ | मदर युनिट संख्या | १०४ | १०४ मदर युनिट |
| २. | कुक्कुटपालक लाभार्थी संख्या | ४१७ लाभार्थी प्रती मदर युनिट | ४३३६८ लाभार्थी |
| ३ | पक्षी निवारा | रु.१५००/- प्रती कुक्कुटपालक लाभार्थी | रु.६५०.५२ लक्ष |
| ४. | पक्षी वाटप<br>• एक दिवशीय पिल्लांची किंमत-रु.२२/-,<br>• वाहतूक व इतर खर्च-रु.२/-,<br>• मर्तूक नुकसान - रु.१.५०,<br>• ४ आठवडयापर्यंतचे पक्षीखाद्य-५००ग्रॅम @) रु.२६/- किलो- रु.१३/-<br>• ब्रुडींग, औषधे, लसीकरण,वाहतूक खर्च-रु.३/-<br>• एकूण किंमत-रु.४१.५० म्हणजेच रु.४२/-<br>• वरकड खर्च (ओव्हरहेड्स) ३५ टक्के-रु.१५/- | ४५ पक्षी प्रती लाभार्थी याप्रमाणे ४३३६८ लाभार्थींना १९५१५६० एवढे पक्षी वाटप करण्यास प्रती पक्षी दयावयाची रक्कम (मदर युनिट धारकास पहिल्या टप्प्यात रु. ५५/- प्रमाणे, दुसऱ्या टप्प्यात रु. ५८/- प्रमाणे, तिसऱ्या टप्प्यात रु. ६०/- या प्रमाणे - ३ टप्प्यात देय राहील ) | रु. १११४.५६ लक्ष |
| ५. | मदर युनिट धारकास दयावयाचे अनुदान | रु.६०,००० प्रती मदर युनिट | रु ६२.४० लक्ष |
| | **एकूण** | | रु.१८२७.४८ लक्ष |
| एकूण ४३३६८ लाभाधारकांचे व यंत्रणेचे प्रशिक्षण व क्षमता वांधणी खर्च | | | रु. २८२.७५ लक्ष |

पृष्ठ ९ पैकी ३

शासन निर्णय क्रमांकः कुक्कुट-२०१७/प्र.क्र. २७१/पदुम-४

| | |
|---|---|
| इतर आकस्मिक व तातडीचा खर्च, योजना मूल्यमापन व सादीलवार खर्च (एकूण प्रकल्पाच्या ५ टक्के) | रु.१०५.५१ लक्ष |
| राज्य प्रकल्प समन्वयक कक्ष अंदाजे खर्च | रु.४०.०० लक्ष |
| **प्रकल्पाचा एकूण खर्च** | (रु. २११०.२३ लक्ष + रु. १०५.५१ लक्ष + ४०.०० लक्ष ) **= रु. २२५५.७४ लक्ष** |

